# 'कवीश्वर घराण्याचा वंशवृक्ष'

श्री. बाळकृष्णशास्त्री

- श्री. भालचंद्र उर्फ दाजी दीक्षित × श्री. सौ. सगुणाबाई
- श्री. चिंतामण शास्त्री

श्री. भालचंद्र उर्फ दाजी दीक्षित × श्री. सौ. सगुणाबाई यांची अपत्ये:

- श्री. रामचंद्र
- श्री. वक्रतुंड महाराज (ज.आश्विन व. ४, १७६१) × श्री. सौ. सावित्रीबाई (श्री. राजाराम कोचकयांच्या कन्या)
- श्री. सौ. शारदा (निर्याण भाद्र.शु. ४, १८२९)
- दिनकर

श्रीरामशास्त्री:

- श्रीगणेशशास्त्री
- श्रीजनार्दनशास्त्री

श्री. वक्रतुंड महाराज × श्री. सौ. सावित्रीबाई:

- श्री. धुंडिराज महाराज × श्री. सौ. सरस्वतीबाई (श्री. सौ. आईसाहेब) (सिरहट्टी (धारवाड) येथील श्री. गोपाळराव हणमसागर यांची कन्या)
- श्री. सौ. नर्मदा (सांगली)

श्री. धुंडिराज महाराज × श्री. सौ. सरस्वतीबाई:

- श्री दत्तमहाराज (पुणें)
- श्री. दिगंबर आयुर्वेदतीर्थ नेसरी (कोल्हापूर)
- श्री. वासुदेव (जालना)
- सौ. पद्मावतीबाई कुळकर्णी (सांगली)
- श्री. श्रीपाद संस्कृत प्रचारक काव्यतीर्थ अंधेरी, मुंबई

। श्री ।

# प. पू. श्री धुंडिराज महाराजांची पत्रिका


जन्मस्थळ :– नरसोबा वाडी

**जन्म** :– शके १८०८, संवत १९४२, व्ययनाम संवत्सरे ज्येष्ठ मासे शुक्ल पक्षे २ सह ३, आर्द्रा न. ४४–२२ प. गंड योग, घ. ५०-१२ प. तैतिल करणे ; दि. घटी ३२–३६ प.

**तारीख** :– ४–६–१८८६ शुक्रवार इष्ट घ. २७–३७ प. (दु. ४ वा. अंदाजे)

लग्न – तूळ स्वामी शुक्र चन्द्रराशी मिथुन ३ चरण; राशी स्वामी बुध नक्षत्र चरण स्वामी शनि

## जन्म लग्न कुंडली




॥ शुभं भवतु ॥

## ग्रहयोग व फळे

१) नवपंचम योग :– अ) शुक्र मंगळ व शुक्र राहू, ब) रवि-गुरु व गुरु-बुध

२) त्रिरेकादश योग :– अ) शुक्र चन्द्र; शुक्र शनि, ब) शनि मंगळ व शनि - राहू, क) चन्द्र मंगळ व चन्द्र राहू

३) सर्व ग्रह उदित भागात (उजव्या बाजूला)

४) लग्नेश व अष्टमेश शुक्र सप्तमात. चतुर्थ व पंचम केन्द्राधिपती शनि नवम केन्द्रात आणि दशमाधिपती चन्द्र पण नवमात हे योग जोरदार आहेत. दर्जा श्रेष्ठ व आकर्षक, उत्तरोत्तर भाग्य वर्धक, गूढ विद्या, अध्यात्म बल, पुष्कळ प्रवास तीर्थ यात्रा व सन्मान योग.

५) शनि व बुध हे शुभ फले देणारे आहेत. रवि मंगळ गुरु अशुभ.

Scanned with AnyScanner

। श्री ।

श्री धुंडिराज महाराज यांच्या . कालस्वरुप सौरीशांतीच्या म्हणजेच ाव्वदाव्या जन्मोत्सवाच्या शुभ निमित्ताने त्यांचे अल्प चरित्र लिहिण्याचा ाला योग लाभला हे मी माझे परमभाग्य समजतो. 'वाटे, चरित्र त्यांचे कांहीं ापण तरावया गावे' असे मयूर कवीने म्हटलेच आहे. श्री धुंडिराज हाराजांचा व त्यांचे सुपुत्र श्री दत्त महाराज यांचा मजवर लोभ आहे. पण श्री धुंडिराज महाराज यांचा दीर्घ सहवास मला लाभलेला नाही किंवा यांच्या थोर उज्वल चरित्रातील कथाभागही पहाण्याचा प्रसंग आलेला नाही. वेनम्रपणें त्यांनाच जुनी माहिती विचारुन व त्यांच्या भक्तांकडूनही जीवन-ृत्तान्त व प्रसंग गोळा करुन मी हा यथाशक्ती प्रयत्न केला आहे. तो सफल । उपयुक्त करणें श्री धुंडिराज महाराज यांच्याच हाती आहे.

चार पांच पिढ्यापासून . वैदिक प्राच्य संस्कृत विद्या, श्रौतस्मार्त यागा-ुष्ठान, मन्त्रतन्त्रशास्त्र व महाभारत, भागवत इत्यादीवर प्रभुत्व असलेल्या, शसेवेत रममाण होणाऱ्या व ईश्वरी वरदान असलेल्या पवित्र, पंडित, थोर व ामवंत शास्त्री घराण्यात आपले चरित्रनायक श्री धुंडिराज महाराज यांचा न्म झाला आहे.

श्री धुंडीराज महाराज यांचे पूर्ण नांव श्री धुंडिराज वक्रतुंड कवीश्वर असे ाहे. त्यांचा जन्म ज्येष्ठ शुद्ध द्वितीयेस शके १८०८ मध्ये नरसोबाच्या वाडीस ाला. त्यांचे वय सध्या नव्वद वर्षांचे आहे. पण कानाचे बधिरत्व सोडले तर यांची प्रकृती निकोप असून ते हिंडू फिरु शकतात व थोड्या मदतीने प्रवासही रतात.

Scanned with AnyScanner

यांचे घराणें मूळचे नगरच्या आग्नेय दिशेस सुमारे वीस बावीस मैलावर मांडव्य ऋषींचे तपोवन म्हणून प्रसिद्ध असलेल्या मांडवगणचे आहे. या गांवी शिवाचे स्वयंभू स्थान आहे. यांच्या घराण्याचे उपनांव प्रथम सप्तर्षि असे होते. नगरच्या श्री दत्त मंदिराचे पुजारी श्री सप्तर्षि हे यांच्याच कुळातलें आहेत. सप्तर्षि हे शुक्ल यजु:शाखीय माध्यंदिन असून यांचे गोत्र उपमन्यु आहे.

त्यावेळच्या यावनी राज्याच्या जाचाला कंटाळून या घराण्यातील कुटुंबांनी मांडवगणहून निरनिराळ्या गांवी स्थलांतर केले. श्री धुंडिराज महाराज यांची शाखा वैराजक्षेत्री म्हणजे हल्लीच्या वाई गांवी गेली. यांचे भाऊबंद वाई येथे आहेत.

श्री धुंडिराज महाराज यांच्या आजोबांचे नांव भालचन्द्र असून त्यांना दाजी दीक्षित म्हणत. रामायण, महाभारत, भागवत या ग्रंथाचा त्यांचा सखोल व्यासंग असून ते पुराण व प्रवचन उत्तम करीत. मन्त्रशास्त्रही त्यांना उत्तम अवगत होते. श्रौतस्मार्त याज्ञिक कर्मातही ते प्रवीण असून धर्मशास्त्रातील पंडित व तज्ज्ञ होते. ते प्रतिभासंपन्न कवी असून त्यांनी संस्कृतात व प्राकृतात आख्याने रचिली आहेत. त्यांच्या चुलत घराण्यातील श्री खंड दीक्षीत हेही विद्वान शास्त्री असून यज्ञकर्मात फार निष्णात होते. त्यांनी एक याज्ञिक ग्रंथ लिहिलेला आहे.

श्री दाजी दीक्षित यांच्या काळात सातारच्या दरबारात धर्मशास्त्राच्या प्रश्नावरील निर्णयासाठी वाईच्या पंडितांना मुद्दाम निमंत्रण देत. श्री दाजी दीक्षित हे व्युत्पन्न पंडित व धर्मशास्त्रात पारंगत असल्यानें त्यांना प्रामुख्याने निमंत्रण येई. दरबारात असाच एक ग्रामीण वाद उत्पन्न होऊन त्याच्यासाठी श्री दीक्षित यांना हजर रहाण्याचा आदेश आला. तेव्हां राजदरबाराच्या मान्यतेसाठी त्यांना हवा तो निर्णय देण्याचा प्रसंग येऊ नये म्हणून ते संकट टाळण्यासाठी श्री दाजी दीक्षित त्वरीत निर्णय घेऊन वाई सोडून घोड्यावरुन नरसोबाच्या वाडीला आले व तेथेंच राहिले यावरुन त्यांची धर्मनिष्ठा व तिच्यासाठी स्थानत्याग करण्याची तयारी दिसून येते.



Scanned with AnyScanner

श्री नरसोबाच्या वाडीला श्री दाजी दीक्षित यांनी श्री दत्तात्रेयाची उत्कृष्ठ उपासना केली. जप-जाप्य, अध्यात्मचिंतन, गुरुचरित्राची पारायणे व दत्तसेवा यात ते दंग असत. रोज पांच श्लोक रचून ती स्तुतिसुमने श्री दत्ताच्या चरणी अर्पण करण्याचा त्यांचा परिपाठ होता. त्यांच्या उत्कृष्ट व प्रासादिक काव्यप्रतिभेवरुन लोक त्यांना कवीश्वर म्हणू लागले व तेच नांव पुढे प्रचलित झाले. आडनांवाचे पंडित, महर्षि, विद्यासागर पुष्कळ असतात पण स्वतःच्या ईश्वरदत्त गुणामुळे मिळालेल्या पदवीने कवीश्वर नामाभिधान धारण करणारे श्री दाजी दीक्षित विराळाच म्हणावे लागतील. सप्तर्षि हे उपनांव जाऊन तेव्हांपासून कवीश्वर हेच आडनांव प्राप्त झाले.

वाडीलाच कायमचे रहावे असे त्यांना वाटू लागले होते. एके दिवशी त्यांनी आपले सगळे कवित्व श्री दत्तात्रेयाला अर्पण करून या बाबतीत कौलच मागितला. तेव्हां त्यांना स्वप्नात श्री नृसिंहसरस्वती महाराजांचे दर्शन घडले. स्वामींनी त्यांना आशीर्वाद दिला 'येथेच रहा. तुला भाजीभाकरी खास मिळेल !' हा आशीर्वाद तात्काल सफल झाला. या शुभदर्शनानंतर पंधराच दिवसात कागवाडच्या श्री. फणसळकरांनी त्यांना रहाण्यासाठी कृष्णाकाठावर तीन मजली वाडा दान म्हणून दिला ! तसेंच जवळच्याच कुरुंदवाडच्या संस्थानिकांनी त्यांना अनगोल, माधवपूर (वडगांव) व तिकोरा येथील जमिनी इनाम म्हणून दिल्या. त्या अजूनही त्यांच्या घराण्याकडे आहेत. कुरुंदवाडच्या राजेसाहेब पटवर्धनांचा त्यांना चांगलाच आश्रय मिळाला. येणेंप्रमाणें प्रभुकृपेने त्यांची चांगली सोय झाल्याने श्री दाजी दीक्षित आनंदाने वाडीलाच राहूं लागले. त्यांनी संस्कृतमध्ये हरिश्चन्द्राख्यान व गालवचरित्र लिहिले असून श्री गुरुचरित्रातील सतीच्या तीन अध्यायावर संस्कृतात सती चरित्रही रचिले आहे. प्रसंगविशेषी विनंती केल्यास समारंभासाठी ते नाटकही रचून देत असत व त्याचे प्रयोगही उत्तम होत.

श्री दाजी दीक्षित यांच्या घराण्याची कुलस्वामिनी माहूरची श्री रेणुकामाता आहे. कुलात उपासना श्री गणपतीची आहे. त्यांचे आजोबा

Scanned with AnyScanner

श्री दादा दीक्षित यांच्या वडिलांनी मोरगांव क्षेत्री जाऊन मुद्गल पुराण भाष्य लेखक श्री गणेश योगीन्द्र महाराज यांच्याकडून श्रीगणेशमन्त्रोपासना घेतली होती. त्यांनी श्रीगणेशव्रत पुरश्चरण वगैरे करुन व नुसत्या दुर्वांकुरावर वर्षभर राहून श्री गणेशाची कडकडीत उपासना केली. तेव्हां श्रीगणेश प्रसन्न होऊन त्यांना श्रीगणेशाची एक स्वयंभू मूर्ती मिळाली ! तसेच स्वप्नात एका तेजस्वी ब्राम्हणाचे दर्शन होऊन आशीर्वाद मिळाला. 'तुझी सेवा पावली. तुझे काम झाले. तु आता घरी जा. तुझ्या कुळात ईश्वरी अनुग्रह असलेले व पुराण वाङमयपारंगत विद्वान जन्मास येतील !" हीं मूर्ती श्री धुंडिराज महाराजांच्या घरीं आजही आहे.

श्री दाजी दीक्षित हे वाडीला श्रीदत्तात्रेय व श्रीगणेश या दोघांचीही कडक उपासना करीत. पहाटे उठून ते 'वांछाकल्प' व 'विद्यागणेश' यांचा पाठ करीत. विद्यागणेश हा स्वतंत्र मन्त्र असून त्याचा प्रथम सोळा वेळा ब्राम्ही मुहूर्तावर पाठ करायचा असतो व नंतर वांछाकल्प या मंत्राचा सबीज सरळ व व्युत्क्रम पद्धतीने एकदा पाठ म्हणण्याचा प्रघात आहे. श्री दाजी दीक्षित यांच्यावर श्रीगणेशाची कृपा असून त्यांना दृष्टान्त होत असत. श्रीगणेश व श्रीदत्त एकच आहेत अशी त्यांची अभेद बुद्धी व श्रद्धा होती. सातान्याजवळील धावडशी येथील श्रीब्रम्हेन्द्रस्वामींचा सहवास व कृपा यांचा त्यांना लाभ झाला होता. स्वामींच्या गुणवर्णनपर काही पद्यरचनाही श्री दाजी दीक्षित यांनी केलेली आहे.

यांच्या पत्नी श्री सौ. सगुणाबाई या एकनिष्ठ पतिव्रता व फार धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. त्यांच्या पतीने त्यांना सांगितले होते की "रोज श्रीदत्ताला १०८ प्रदक्षिणा घालून माळ जपत जा. यात खंड पडता कामा नये. पण सौ. सगुणाबाईंना दिवस राहिल्यावर पुढे पुढे त्यांना या प्रदक्षिणा घालणे जड जाऊ लागले. तेव्हां श्रीभालचन्द्रशास्त्र्यांनीच पत्नीला म्हटले 'आता कांही दिवस प्रदक्षिणा बंद ठेवलीस तरी चालेल. तुला हे श्रम झेपणार नाहीत. पण सौ. सगुणाबाई मोठ्या दृढनिश्चयी व भाविक होत्या. त्या विनयाने



Scanned with AnyScanner

म्हणाल्या 'आपण माझ्या नियमात आता मोडता घालू नये. मी हळूहळू मधे मध्ये थांबून पण रोज प्रदक्षिणा पुरी करीन. त्यात खंड नको. देव दयाळू व जाणता आहे. तो सगळ नीट निभवून घेईल! पत्नीच्या या उत्तराने श्री भालचन्द्र शास्त्र्यांना फार आल्हाद वाटला. व 'तुला गणपतीचा महान उपासक पुत्र होईल!' असा त्यांनी प्रसन्न अन्तकरणाने पत्नीला शुभाशीर्वाद दिला! शके १७६१ मध्ये आश्विन वद्य चतुर्थीला संकष्ट चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर माध्यान्हानंतर सौ. सगुणाबाई सुखरुप प्रसूत होऊन त्यांना पुत्ररत्न झाले! आशीर्वाद सफल झालेला पाहून सगळीकडे आनंदी आनंद झाला! मुलांचे नांव वक्रतुंड असे ठेवण्यात आले.

• • •

# श्रीवक्रतुंड महाराज

या मुलाचे दैवीगुण लहानपणापासूनच दिसू लागले. खेळण्यातच देव मांडावा, त्याला फुले वहावी, त्याला नमस्कार करावा, टाळचा वाजवाव्या, आरतीसारखे कांही गावे, अशा त्याच्या बाललीला असत. यांचे सख्खे चुलते श्री चिंतामण शास्त्री यांनी वक्रतुंडांना लहानपणी पुष्कळ सांभाळले. शास्त्रानुसार आठव्या वर्षी श्रीवक्रतुंडांचा मौजीबंधन विधी झाला. मुंज झाल्याबरोबर बटूने व नवी सून आली की तिने संकष्ट चतुर्थीचे व्रत स्वीकारायचे असा या घराण्यात कुलाचार आहे. मुंजीनंतर श्री वक्रतुंड यांची श्रीगणेश पूजा अर्चा पद्धतशीर सुरु झाली. आपल्या शास्त्रज्ञ व वेदवेदान्तपंडित पित्याजवळच त्यांनी याजुष माध्यंदिन वेदसंहितेचे चाळीस अध्याय याज्ञिक पंचप्रयोग, उपनयनादि षोडश संस्कार प्रयोग यांचे अध्ययन केले. त्यांच्याच घराण्यातील वे. शा. सं. श्री बाळशास्त्री दीक्षित व श्री लक्ष्मणशास्त्री या विद्वान गुरु जवळही ते संस्कृत व व्युत्पत्तीशास्त्र शिकले. त्यांची बुद्धी अतिशय कुशाग्र असून स्मरण व पाठान्तर शक्ती दांडगी होती. महाभारत, भागवत यांचे सप्ताह व प्रवचनकला यांतही ते अल्पवयातच पारंगत झाले.

Scanned with AnyScanner

त्यांच्या स्मरणशक्तीचे उदाहरण द्यायचे तर मोठेपणी मुलांना शिकवतांना एखाद्या प्रश्नाचे उत्तर म्हणून संदर्भादाखल ते शिकवता शिकवता सहज सांगत. "धर्मसिन्धूच्या पोथीतील तृतीय परिच्छेदात चवथ्या पानावर हा विषय आला आहे. तो काढून नीट वाच."

श्री वक्रतुंड शास्त्र्यांना वक्तृत्वाची अलौकिक ईश्वरदत्त देणगी होती. रामायण, महाभारत, भागवत यांच्या सप्ताहातील त्यांची प्रवचने म्हणजे श्रोत्यांना वाङ्मयरसाची मेजवानी व एक अपूर्व पर्वणीच वाटत असे. चातुर्मासात त्यांच्या प्रवचनाला चार चार हजार श्रोते आवडीने जमून मंत्रमुग्ध अवस्थेत श्रवणानन्द लुटत. डोक्यात विषय व जिव्हेवर सरस्वती सदैव सज्जच असत. त्यामुळे प्रवचनाची तयारी करण्याचा कधी प्रश्नच नसे. कधी कधी तर प्रवचनाचे प्रारंभी समोर मांडलेल्या दत्त बाळाच्या प्रतिमेला प्रणाम केल्यावर ते श्रोत्यांना हसून प्रश्न करीत, सज्जनहो ! आज कोणचा विषय श्रवण करण्याची आपली इच्छा आहे ? यावर धीटपणाने कोणी विषय सांगितला तर त्यावरच दोन दोन तास माहितीपूर्ण, उद्‌बोधक व रसाळ प्रवचन करीत. कुरुंदवाडला सरकार वाड्यात श्रीराजेसाहेब स्नान करीत असतांना पुराण वाचण्याची पद्धत असे. श्री वक्रतुंडशास्त्री त्याप्रमाणे पुराण वाचीत. तीच प्रथा त्यांनी वाडीला सुरु केली. श्रीस्वारीच्या सायंकाळच्या, प्रदोषाच्या पुजेच्या वेळी स्नानापासून पोषाख करून स्वारी पालखीत बसण्यास निघेपर्यंत श्री वक्रतुंड शास्त्री नित्यनेमाने पुराण वाचीत.

श्री वक्रतुंड शास्त्री श्री दत्तात्रेयाच्या भोगमूर्तीजवळच पुष्कळ काळ रहात व ध्यानधारणा करीत आणि भाष्य वाचीत. त्यावेळी वाडीला श्री गोविंदस्वामी द्रविणऐच्या नांवाचे फार मोठे अधिकारी सन्त होते. त्यांनी श्री वासुदेवानन्द सरस्वतींना मन्त्र दीक्षा दिली होती. त्यांचीही श्री वक्रतुंडशास्त्री शिष्याप्रमाणे सेवा करीत.

पण श्री वक्रतुंड शास्त्र्यांना संसारात एक मोठे शल्य होते. त्यांची संतती अल्पायुषी ठरुन वाचत नसे. त्यांना वीस अपत्ये झाली. पण दोन मुलीशिवाय



Scanned with AnyScanner

म्हणाल्या 'आपण माझ्या नियमात आता मोडता घालू नये. मी हळूहळू मधे मध्ये थांबून पण रोज प्रदक्षिणा पुरी करीन. त्यात खंड नको. देव दयाळू व जाणता आहे. तो सगळ नीट निभवून घेईल ! पत्नीच्या या उत्तराने श्री भालचन्द्र शास्त्र्यांना फार आल्हाद वाटला. व 'तुला गणपतीचा महान उपासक पुत्र होईल !' असा त्यांनी प्रसन्न अन्तकरणाने पत्नीला शुभाशीर्वाद दिला ! शके १७६१ मध्ये आश्विन वद्य चतुर्थीला संकष्ट चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर माध्यान्हानंतर सौ. सगुणाबाई सुखरुप प्रसूत होऊन त्यांना पुत्ररत्न झाले ! आशीर्वाद सफल झालेला पाहून सगळीकडे आनंदी आनंद झाला ! मुलांचे नांव वक्रतुंड असे ठेवण्यात आले.

• • •

# श्रीवक्रतुंड महाराज

या मुलाचे दैवीगुण लहानपणापासूनच दिसू लागले. खेळण्यातच देव मांडावा, त्याला फुले वहावी, त्याला नमस्कार करावा, टाळचा वाजवाव्या, आरतीसारखे कांही गावे, अशा त्याच्या बाललीला असत. यांचे सख्खे चुलते श्री चिंतामण शास्त्री यांनी वक्रतुंडांना लहानपणी पुष्कळ सांभाळले. शास्त्रानुसार आठव्या वर्षी श्रीवक्रतुंडांचा मौजीबंधन विधी झाला. मुंज झाल्याबरोबर बटूने व नवी सून आली की तिने संकष्ट चतुर्थीचे व्रत स्वीकारायचे असा या घराण्यात कुलाचार आहे. मुंजीनंतर श्री वक्रतुंड यांची श्रीगणेश पूजा अर्चा पद्धतशीर सुरु झाली. आपल्या शास्त्रज्ञ व वेदवेदान्तपंडित पित्याजवळच त्यांनी याजुष माध्यंदिन वेदसंहितेचे चाळीस अध्याय याज्ञिक पंचप्रयोग, उपनयनादि षोडश संस्कार प्रयोग यांचे अध्ययन केले. त्यांच्याच घराण्यातील वे. शा. सं. श्री बाळशास्त्री दीक्षित व श्री लक्ष्मणशास्त्री या विद्वान गुरु जवळही ते संस्कृत व व्युत्पत्तीशास्त्र शिकले. त्यांची बुद्धी अतिशय कुशाग्र असून स्मरण व पाठान्तर शक्ती दांडगी होती. महाभारत, भागवत यांचे सप्ताह व प्रवचनकला यांतही ते अल्पवयातच पारंगत झाले.



Scanned with AnyScanner

त्यांच्या स्मरणशक्तीचे उदाहरण द्यायचे तर मोठेपणी मुलांना शिकवतांना एखाद्या प्रश्नाचे उत्तर म्हणून संदर्भादाखल ते शिकवता शिकवता सहज सांगत. "धर्मसिन्धूच्या पोथीतील तृतीय परिच्छेदात चवथ्या पानावर हा विषय आला आहे. तो काढून नीट वाच."

श्री वक्रतुंड शास्त्र्यांना वक्तृत्वाची अलौकिक ईश्वरदत्त देणगी होती. रामायण, महाभारत, भागवत यांच्या सप्ताहातील त्यांची प्रवचने म्हणजे श्रोत्यांना वाङ्मयरसाची मेजवानी व एक अपूर्व पर्वणीच वाटत असे. चातुर्मासात त्यांच्या प्रवचनाला चार चार हजार श्रोते आवडीने जमून मंत्रमुग्ध अवस्थेत श्रवणानन्द लुटत. डोक्यात विषय व जिव्हेवर सरस्वती सदैव सज्जच असत. त्यामुळे प्रवचनाची तयारी करण्याचा कधी प्रश्नच नसे. कधी कधी तर प्रवचनाचे प्रारंभी समोर मांडलेल्या दत्त बाळाच्या प्रतिमेला प्रणाम केल्यावर ते श्रोत्यांना हसून प्रश्न करीत, सज्जनहो ! आज कोणचा विषय श्रवण करण्याची आपली इच्छा आहे ? यावर धीटपणाने कोणी विषय सांगितला तर त्यावरच दोन दोन तास माहितीपूर्ण, उद्‌बोधक व रसाळ प्रवचन करीत. कुरुंदवाडला सरकार वाड्यात श्रीराजेसाहेब स्नान करीत असतांना पुराण वाचण्याची पद्धत असे. श्री वक्रतुंडशास्त्री त्याप्रमाणे पुराण वाचीत. तीच प्रथा त्यांनी वाडीला सुरु केली. श्रीस्वारीच्या सायंकाळच्या, प्रदोषाच्या पुजेच्या वेळी स्नानापासून पोषाख करून स्वारी पालखीत बसण्यास निघेपर्यंत श्री वक्रतुंड शास्त्री नित्यनेमाने पुराण वाचीत.

श्री वक्रतुंड शास्त्री श्री दत्तात्रेयाच्या भोगमूर्तीजवळच पुष्कळ काळ रहात व ध्यानधारणा करीत आणि भाष्य वाचीत. त्यावेळी वाडीला श्री गोविंदस्वामी द्रविणऐच्या नांवाचे फार मोठे अधिकारी सन्त होते. त्यांनी श्री वासुदेवानन्द सरस्वतींना मन्त्र दीक्षा दिली होती. त्यांचीही श्री वक्रतुंडशास्त्री शिष्याप्रमाणे सेवा करीत.

पण श्री वक्रतुंड शास्त्र्यांना संसारात एक मोठे शल्य होते. त्यांची संतती अल्पायुषी ठरुन वाचत नसे. त्यांना वीस अपत्ये झाली. पण दोन मुलीशिवाय

Scanned with AnyScanner

कुणीही वाचले नाही. त्यामुळे वैतागून व विरक्त होऊन त्यांनी श्रीगोविन्द-स्वामींना एकदा कळकळीने प्रार्थना केली "आता संसार पुरे झाला ! मला त्याचा वीट आला आहे. मला संन्यास दीक्षा द्या !" शिष्याचे हे निर्धाराचे शब्द ऐकून स्वामींनी डोळे मोठे करून त्यास आपल्या निश्चयापासून परावृत्त केले. स्वामी समजूत घालण्याच्या स्वरात उद्गारले 'अरे ! तुझा संसार अजून व्हायचा आहे. मी सांगतो, तुझी संतती यापुढे वाचेल. तुला अलौकिक पुत्र होणार आहे ! तुझा विश्वास बसावा हे घे आत्ताच तुला बाळ देतो !' असे म्हणून स्वामींनी स्वत:जवळची श्रीदत्तमुर्ती प्रभावळीसह श्री वक्रतुंड शास्त्र्यांच्या हातात दिली !

या ईश्वरी देणगीने श्री वक्रतुंड शास्त्र्यांना धन्यता वाटली ! त्यांनी त्या दत्तमूर्तीला बालकच समजून त्याचे बारसे केले व 'दत्तू बाळ' असे नांवही ठेवले ! त्या बालकाला कडीतोडी, अलंकार, पाळणा, छत्रचामर सर्व सोपस्कार केले. इतकेच नव्हे तर त्याचे व्रतबन्ध वगैरे सर्व षोडश संस्कार यथाशास्त्र व थाटामाटाने केले !

एकदा श्री वक्रतुंड शास्त्र्यांना काशी यात्रेला जाण्याची इच्छा झाली. म्हणून सहकुटुंब व दत्तु बाळाला घेऊन प्रवासास निघाले. वाटेत एका शिष्याच्या घरी त्यांनी मुक्काम केला. हा शिष्य नुकताच काशीयात्रेला जाऊन आला होता. व तेथून त्याने कावडभर गंगा आणली होती. गुरुमहाराजांचे अचानक आगमन झाल्याने त्याला अत्यानंद झाला. त्याने गुरुंना सचैल गंगास्नान घालून त्यांची षोडशोपचारपूर्वक पुजा केली. त्याच रात्री श्री वक्रतुंड शास्त्र्यांना स्वप्नात दृष्टान्त झाला 'तुझ्या प्रारब्धात काशीयात्रा नाही. तू मागे फिर !' त्या आदेशानुसार श्री वक्रतुंडशास्त्री पुढचा बेत रद्द करून परत आले. पुढे श्री दत्तू बाळाला घेऊन त्यांनी दक्षिणेची यात्रा केली.

प्रवासात ते दत्तू बाळाला मुलासारखेच वागवीत व त्याची काळजी घेत. एकदा ज्याठिकाणी उतरले होते तेथील उपाध्यायाने 'आपण कितीजण आहात ?

Scanned with AnyScanner

असा सांहजिकच प्रश्न केला. तेव्हां दत्तू बाळाला धरुन श्री वक्रतुंड शास्त्र्यांनी आकडा सांगीतला. तेव्हां भोजनासाठी पाने मांडल्यावर एक पान रिकामेच राहिले. 'कोण राह्यलं ? अशीं चर्चा सुरु झाल्यावर उलगडा झाला की पाहुणे मंडळीत दत्तु बाळाचाही समावेश आहे ! याप्रमाणें श्रीवक्रतुंड शास्त्री अगदी सहजपणें व मनापासून दत्तू बाळाला चालता बोलता जिवंत पुत्रच समजत ! त्यांची ही आत्मोपम्य बुद्धी कांही अलौकिकच म्हणावी लागेल !

ही दत्तमुर्ती श्रीधुंडिराज महाराजाजवळ सध्या आहे. ते तिला बंधुसमान मानतात व प्रवासातील त्या मूर्तीला कधी अन्तर देत नाहीत. प्रवासात ही मूर्ती त्याच्या कनवटीलाच डबीत असते. 'ही आमची तंबाखूची डबी आहे !' असे ते विनोदाने म्हणतात.

श्रीवक्रतुंड शास्त्र्यांची एक गोष्ट मोठी उद्‌बोधक व ऐकण्यासारखी आहे. तीवरून त्यांचीं स्वजनाविषयींची आत्मीयता व त्यागवृत्ती दिसून येते.

त्यांचे विभक्त बन्धू श्रीराम शास्त्री यांनी वाडीला एक मोठा यज्ञ केला. पुष्कळ देणग्या मिळूनही त्या महोत्सवात त्यांना १५–२० हजार रुपये कर्ज झाले. ते कर्ज फेडण्यासाठी त्यांनी मिरज वगैरे ठिकाणी प्रवचने करून यत्न केला. श्रीवक्रतुंड शास्त्र्यांनीही अशीच गांवोगांव प्रवचने, सप्ताह करून साहाय्य केलें. पण हे कर्ज न फिटताच श्रीराम शास्त्री निधन पावले. त्यांचे चिरंजीव श्रीगणेश शास्त्री यांचे एकटयाचे हातून हे डोईजड कर्ज फिटणे शक्य नव्हते. वास्तविक श्रीवक्रतुंड शास्त्र्यांवर या कर्जाची कायदेशीर जबाबदारी कांहीच नव्हती. पण आपल्या पुतण्याला सावकार फारच बेजार करीत आहेत असे पाहून त्यांनी आपणहून या प्रकरणात लक्ष घातले. स्वत: सावकाराकडे जाऊन त्यांनी सांगितले "माझ्या पुतण्याला त्रास देऊ नका. मी स्वत: या कर्जाची जबाबदारी घेतो. मी त्याला जमानत रहातो. मी हे कर्ज लवकरच फेडतो. तुम्ही चिंता करु नका. मी आता प्रवचनाच्या दौऱ्यावर निघतो. मिळेल तो निधी आपल्या गांवच्या अन्तु शास्त्री पुजाऱ्याकडे पाठवीत जाईन. तो ती रक्कम कर्ज फेडीत तुमच्याकडे जमा करीत जाईल."

याप्रमाणें आश्वासन देऊन श्रीवक्रतुंड शास्त्री पूर्वेकडे व श्रीगणेश शास्त्री उत्तरेकडे असे दोघेही प्रवचनासाठी गांवोगांव निघाले. याप्रमाणें तीन वर्षें फिरुन त्यांनी हे कर्ज स्वकष्टाने फेडून टाकले ! श्रीराम शास्त्री हे त्यांचे ज्येष्ठ बंधू होते. 'ज्येष्ठो भ्रातः पितुः समः' या न्यायाने त्यांनी पितृऋण व कुलऋण निर्धाराने फेडले !

कर्ज फेडीसाठी केलेल्या प्रवचनाच्या या प्रदीर्घ दौऱ्यात त्यांना अनंत अडचणी आल्या. त्यांचे बन्धू श्रीरामभाऊ मिरजेकडे व श्रीवक्रतुंड शास्त्री फलटणकडे असे प्रवचनास निघाले होते. फलटणला श्रीवक्रतुंड शास्त्र्यांना स्वप्न पडले की, श्रीगणेश मूर्तीचा हात एकाएकी निखळून खाली पडला. हे अशुभ चिन्ह समजून ते ताबडतोब बंधूचे कुशल जाणण्यासाठी मिरजेस गेले. श्रीरामभाऊची सुदैवाने भेट झाली. पण ते आजारी होते तो विकार वाढून ते स्वर्गस्थ झाले !

त्या काळात प्रवास बैलगाडीतूनच व पुष्कळदा दाट जंगलातून करावा लागे. एके प्रसंगी जवळपास गांवे नसलेल्या जंगलात त्यांना मुक्काम करावा लागला. एका झाडाखाली सर्व मंडळी उतरली होती. थोड्या अंतरावर एक लामण तांडा होता व ते जंगली लोक शेकोटया भोवती कसली गाणी म्हणत नाचत ओरडत होते. या मंडळींना पाहिल्यावर चांगली शिकार सापडली म्हणून आनंदाने ते रानटी लोक लाठ्या काठ्या घेऊन या प्रवाशांना लुटण्यासाठी धावतच आले. पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं श्रीवक्रतुंड महाराजांच्या तेजस्वी व दिव्य मूर्तीचे दर्शन झाल्याबरोबर त्यांचा दुष्टपणा कोठच्या कोठे पळून गेला व मंदिरातील मूर्तीच्या पुढील कर्माच्या लीनतेने त्या सर्व जंगली लोकांनी श्रीवक्रतुंड शास्त्र्यांना लवून प्रणाम केला. इतकेच नव्हे तर त्या सर्व मंडळींच्या संरक्षणाची हमी घेऊन विचारपूस करून त्यांची उत्तम व्यवस्था ठेवली व निरोप देतांना सर्वांना चहा दिला !

एकदा या कर्ज फेडीच्या प्रवचनाच्या दौऱ्यात वक्रतुंड शास्त्री लांब परगांवला गेले असतांना बालवयाचे श्री धुंडिराज महाराजही त्यांच्याबरोबर होते.



Scanned with AnyScanner

श्रीवक्रतुंड शास्त्र्यांना आतून काय आदेश मिळाला असेल त्यांनाच ठाऊक, पण पुढचा कार्यक्रम रहित करून ते घाईने वाडीस परत येण्यास निघाले. वाटेत अतोनात पाऊस पडला असल्याने रस्ता फारच खराब झाला होता. बैलगाडी चालविण्यास फारच कष्ट पडत. मधूनमधून रस्ता चढउताराचा व धोक्याचा असे. प्रवासात एके ठिकाणी मोठा उतार व खडकाळ भाग लागला म्हणून मंडळी पायीच चालू लागली. फक्त श्री धुंडिराज महाराज लहान बाळ म्हणून गाडीत बसलेले होते व गाडीवाला सावधगिरीने गाडी हाकीत होता. पण जास्तच उतरणीचा रस्ता आल्याबरोबर श्रीवक्रतुंड शास्त्र्यांनी गाडी थांबवून मुलाला गाडीतून खाली घेतले व गाडी पुढे चालू लागली. तोच उतारावर बैलाचे पाय घसरुन गाडी गरंगळत खाली जाऊन उलटी पालटी झाली व मोडून गेली. प्रसंगावधानाने किंवा दैवी पूर्व सूचनेने श्रीधुंडिराज महाराजांना वेळीच उतरवून घेतल्याने मोठाच जिवावरचा प्रसंग टळला.

याच प्रवचनाच्या दौऱ्यातील एका प्रसंगावरून श्रीवक्रतुंड शास्त्र्यांचे व्यवहारज्ञान व आपल्यापासून कोणालाही नुकसान पोहचू नये याबद्दलची दक्षता दिसून येते.

प्रवचने आवरती घेऊन ते वाडीला परत येत असतांना, वाडीहून त्यांच्या दर्शनासाठी मुद्दाम निघालेली भक्तमंडळी त्यांना एका मुक्कामात भेटली. अनायासे वाटेतच श्रीगुरुंचे दर्शन झाल्याने आनंदीत होऊन शिष्यांनी त्याच गांवी त्यांची पाद्यपूजा करुन सत्कार व मोठा सोहळा केला. शिष्यांपैकी एकजण तट्टूवर बसून प्रवास करीत होता. श्रीवक्रतुंड महाराजांबरोबर एक गाय व तीचा एक मस्त गोऱ्हा होता. त्याला मंडळींनी सहज मैदानात मोकळे सोडल्याबरोबर तो आडदांड गोऱ्हा सरळ तट्टूच्या अंगावर चाल करुन गेला व त्याच्या पोटाखाली शिरुन त्या मस्तवाल गोऱ्ह्याने त्या तट्टूच्या पोटात शिंगे खुपसून त्याला उचलून खाली पाडले. त्यामुळे मरणप्राय जखमा व वेदना होऊन ते तट्टू तेथेच मरुन पडले ! श्रीवक्रतुंड शास्त्र्यांना हे कळताच त्यांना फार वाईट वाटले व ते आपल्या मंडळीवर रागावले. पण झाल्या गोष्टीला कांहीच उपाय नव्हता. ज्याचे तट्टू होते त्या शिष्याने मनापासून पुनः पुन्हा सांगितले की गुरुंनी कांही मनावर घेऊ नये. तट्टू गेले तरी प्रवासात अडचण पडणार नाही. पण त्याच दिवशी त्या गांवचा बाजार आहे असे कळल्याबरोबर श्री वक्रतुंड शास्त्री स्वतः बाजारात गेले व त्या तट्टूसारखे दुसरे तट्टू स्वतः विकत घेऊन त्यांनी ते शिष्याला प्रसाद म्हणून दिले !

पण या कर्ज फेडीच्या प्रकरणात मोतीरामशेट म्हणून एक दोन हजाराचा सावकार चुकून राहून गेला ! श्रीवक्रतुंड शास्त्री कर्जफेडीनंतर निश्चितपणे नगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील खर्ड्याला प्रवचन पुराणासाठी गेले होते. बरोबर ८–९ वर्षांचे श्रीधुंडीराजही होते. हा मारवाडी सावकार मोठा हुशार व चिकाटीचा म्हटला पाहिजे. श्रीवक्रतुंडशास्त्र्यांचा पत्ता काढून तो आपल्या शिरोड गांवाहून थेट खर्ड्याला आला व वक्रतुंड शास्त्र्यांचा शोध करुं लागला ! श्रीवक्रतुंड शास्त्री मुरलीधर मंदिरात उतरले होते. श्रीधुंडीराज हा लहान मुलगा बाहेर खेळत होता. त्याला ओळखून मारवाड्याने वडीलांचा पत्ता विचारला. मुलाला कांहीच कल्पना नसल्याने श्रीधुंडीराज धावत आत वडिलाकडे गेले व बाहेर कोणी शेठजी भेटावयास आल्याचे त्यांनी सांगितले. श्रीवक्रतुंड शास्त्री बाहेर येऊन पाहतात तो तगादा करणारा सावकार ! पण आपली शांतवृत्ती यत्किंचित ढळू न देता त्यांनी शेठजीला सन्मानाने आत नेऊन योग्य तो पाहुणचार केला, पण शेठजी बोलून चालून व्यवहारी व पैशावर नजर ठेवणारा. तो तुटकपणे म्हणाला 'मला आदर सत्कार वगैरे काही नको ! मी याने भुलणारा नाही, पैसे केव्हां फेडता ते बोला ! त्यासाठी मी मुद्दाम वाडीहून इतक्या लांब तंगडत आलो आहे !' तरीही श्रीवक्रतुंड शास्त्र्यांची सौम्य स्थिती ढळली नाही. ते पुर्वीच्याच आपलेपणाने व सौजन्याने म्हणाले 'शेटजी ! चिंता करु नका ! त्याचीही सोय करतो. पुराण चालु आहे. परवाच समाप्ती आहे. समाप्तीच्या दिवशी जी दक्षिणा पोथीपुढे येईल ती सगळी तुम्ही कर्ज फेडीत घ्या ! तो पर्यंत या गांवी स्वस्थ चित्ताने रहा!'

त्याप्रमाणें तो मारवाडी खरोखरच तेथे राहिला. ही हकीगत कर्णोपकर्णी गांवातील लोकांना समजल्यावर त्यांना शेठजीचा संतापच आला. त्यांनी

हिरिरीने पुष्कळच दक्षिणानिधी जमविला. समाप्तीच्या दिवशी तीन हजार श्रोतृसमाज जमला होता. एकूण तीन हजार निधी जमा झाला. याशिवाय कपडालत्ता निराळाच व्यवस्थापकांनी मारवाड्याला तेथल्या तेथंच पूर्ण कर्ज देऊन टाकून पावती मागितली. तेव्हां श्रीवक्रतुंड शास्त्री सरळ स्वभावाने म्हणाले 'जाऊं द्या ! पावती काय करायची ? शेठजी आपलेच आहेत. ते थोडेच बदलणार आहेत ! "त्यांची रक्कम त्यांना मिळाली छान झालं ! भगवन्तानें कृपा केली !" दोन दिवस महाभारतावरील रसाळ प्रवचन श्रवण करून व हा सगळा सुखसोहळा पाहून शेठजी थंडागारच झाला ! त्याच्या वृत्तीत पालट होऊन तो श्रीवक्रतुंडशास्त्र्यांच्या चरणी लीन झाला. येणेप्रमाणे पैसा हा हातचा मळ व देऊन टाकण्याची वस्तू आहे अशीच संपत्तीबद्दल श्रीवक्रतुंड शास्त्र्यांची निर्लोभ व विरक्त वृत्ती होती !

# श्री मौनी स्वामी

श्री वक्रतुंड शास्त्र्यांना वाडीला ज्या थोर सन्ताचे मार्गदर्शन व कृपा प्रसाद लाभला त्यात श्री मौनी स्वामी हे प्रमुख होत.

श्री मौनी स्वामी हे मूळचे सोलापूरकडील होते. लहानपणीच घराबाहेर पडून कडू लिंबाच्या पाल्याचा रस हाच त्यांचा कित्येक वर्षे आहार होता. त्यांनी काशी रामेश्वरच्या यात्रा अनेक वेळा पायी केल्या. पंचवीसाव्या वर्षीच त्यांनी संन्यास दीक्षा घेतली. संन्यासाश्रमात 'प्रद्युम्नसरस्वती' हे हे नामाभिधान त्यांना प्राप्त झाले. पण बारा वर्षे कडकडीत मौनव्रत पाळल्यामुळे 'मौनीस्वामी' असेच सर्वजण त्यांना संबोधीत. मौनानुष्ठानाने त्यांना वाक्सिद्धी प्राप्त झाली होती. उज्जैनीला ते कांही वर्षे राहिले. तेथे त्यांनी गोपालकृष्णाचे सुन्दर मंदिर बांधले आहे. पुढे ते नरसोबाच्या वाडीला येऊन राहिले. श्री वासुदेवानन्द सरस्वती त्यांना गुरुस्थानी मानीत. एवढी त्यांची आध्यात्मिक थोरवी होती. श्री वक्रतुंड शास्त्री श्री मौनी स्वामींची शिष्याप्रमाणे सेवा करीत. मंदिरातील महाभारत पुराण संपल्यावर श्री मौनी स्वामींना महाभारत फार आवडे म्हणून त्यांच्यासाठी मुद्दाम त्यांच्या मठात जाऊन पुन्हां त्यांच्यापुढे महाभारत वाचीत.

श्री मौनी स्वामी यांची सदैव बाल वृत्ती असून लहान मुलांचा त्यांना फार लळा असे. लहान मुलांना खाऊ देणे हा त्यांचा आवडता छंद होता. श्री टेंबे स्वामी यांच्यावर व कर्वीश्वर घराण्यावर त्यांचे विशेष प्रेम असे.

एकदा वाडीला अवर्षण पडून पावसाच्या अभावी लोक हवालदील झाले. तेव्हां कुणी कल्पना काढली की श्री मौनी स्वामींना शरण जावे. त्याप्रमाणे पुष्कळ लोकांचा जमाव त्यांच्या मठात गेला. प्रमुखांनी प्रार्थना केली 'महाराज कसेंही करून पाऊस येऊ द्या !' थोडा वेळ ध्यानस्थ बसून स्वामी उद्गारले ठीक आहे चला ! आपण सगळेच श्रीदत्तात्रयाला शरण जाऊ' सर्व लोकांना घेऊन स्वामी मंदिरात गेले व सर्वांसह आरती करून त्यांनी देवाला मोठ्याने प्रार्थना केली "श्रीदत्तप्रभो ! प्रजेवरील संकट जाण्यासाठी जलधारांचा प्रसाद लवकर द्या !" नंतर त्यांनी देवाला साष्टांग नमस्कार घातला व लोकांना घरोघर जाण्यास सांगितले. नवलाची गोष्ट अशी की, त्याच रात्री आकाशात अचानक ढग येऊन मुसळधार पाऊस पडला.

श्री वक्रतुंड शास्त्र्यांचे वडील बंधू श्रीराम शास्त्री यांची श्रौताग्नि उपासना दांडगी होती. पौर्णिमा, दर्श, चातुर्मास यावेळी इष्टया चालूच असत. त्यांना एकदा साग्निचित ज्योतिष्होम इष्टि करण्याची इच्छा झाली. पण तशी तयारी व सिद्धता कांहीच नव्हती. श्री वक्रतुंडशास्त्री यांनी सल्ला दिला की श्री मौनी स्वामींचा आशीर्वाद मागावा. त्याप्रमाणे दोघेही बंधू श्री मौनी स्वामी व श्री गोविंद स्वामी ओटयावर कथालाप करीत होते तेथे गेले व त्यांनी आपले मनोगत स्वामींना कथन करून कृपा प्रसाद मागितला. तेव्हां प्रसन्न चित्ताने श्री मौनी स्वामी व श्री गोविंदस्वामी या दोघांनींही छान ! छान ! अवश्य यज्ञ करा. सर्व ठीक होईल !' अशा शुभाशीर्वाद दिला. यामुळे उल्हासित होऊन श्री रामभाऊ काशीस गेले व तेथे प्रवचने करून त्यांनी यज्ञासाठी आर्थिक साहाय्य मिळविले व तेथील सर्व शास्त्री पंडीतांना यज्ञाचे

Scanned with AnyScanner

निमंत्रण दिले. काशी यात्रेची समाप्ती गंगा गोदाभेटीत गोदातटाकी करावी असे शास्त्र असल्याने परत येतांना ते नाशिकला उतरले व तेथील सर्व याज्ञिक ब्राम्हवृन्दांना त्यांनी यज्ञाचे आमंत्रण दिले.

राजेरजवाडे व धार्मिक धनिक वर्ग यांनी स्वयंस्फूर्तीने यज्ञाला धान्य पैसावस्तू यांची सढळ हाताने मदत केली. काशी रामेश्वर इत्यादी तीर्थ स्थानांचा ब्रम्हवृन्द यज्ञाच्या कर्मकांडासाठी हौसेने जमला होता. चिंचवनात यथाशास्त्र भव्य मंडप उभारला होता व ऋत्विजांसाठी स्वतंत्र खोल्यांची व्यवस्था केली होती. यज्ञवेदी व यज्ञकुंड कूर्माच्या पाठीवर असावे असे शास्त्र आहे. म्हणून कृष्णा नदीतून मोठे कासवच आणून त्याला खाली मोठ्या जलपात्रात ठेवले होते व तेथेच त्याच्या खाद्याची सोय केली होती. यज्ञ सांगतेनंतर ते जिवंत निघालें तरच यज्ञ यथा शास्त्र व सफल झाला असे मानतात. त्याप्रमाणें या यज्ञाच्या समाप्तीनंतर ते सुखरुप बाहेर पडले ! अवभृत स्नानासाठी यज्ञोनारायणाची कृष्णा शुक्लतीर्थापर्यंत थाटाची प्रचंड मिरवणूक काढण्यात आली. यज्ञात अन्नदानही भरपूर झाले. पूर्णाहुतीला श्रीखंडाचा बेत होता. याच वेळी वसन्तोत्सव सुरु असल्याने यज्ञोत्सवाला विशेषच शोभा आली. येणेप्रमाणें शके १८१३ मध्ये हा साग्निचित अग्निष्टोम यागाचा महायज्ञ निर्विघ्नपणे व मोठ्या थाटात पार पडला ! श्रीवासुदेवानन्द सरस्वती यांचीच काय ती अनुपस्थिती सर्वांना जाणवली. आपले चरित्रनायक श्री धुंडिराज त्यावेळी चार पांच वर्षांचे असल्याने एका शिष्याच्या कडेवर बसून वटपत्रपटावर शयन करणाऱ्या बालमुकुन्दाप्रमाणे हा यज्ञ सोहळा कौतूकाने पहात होते !

श्री मौनीस्वामी श्री वक्रतुंड शास्त्र्यांना बरोबर घेऊन एकदा परगांवी एका गृहस्थाकडे उतरले असतांना यजमानाने त्यांचे स्वागत व पाद्यपूजा केली. पण तो कष्टी दिसला. कारण विचारल्यावर तो म्हणाला "काय करावं ? दुर्दैवाने माझा मुलगा अनेक दिवस पंगू झाला असून अंथरुणाला खिळलेला आहे. त्याचे दुखणे वाढतच आहे. श्री वक्रतुंड शास्त्र्यांनी त्या मुलास उचलून श्री मौनी स्वामीजवळ आणले. स्वामींनी त्या दुर्दैवी मुलाच्या सर्वांगावरून कृपादृष्टी फिरवून व त्याला गोंजारून ते म्हणाले "बाळ भिंतीला धरुन थोडा हळू हळूहळू पावले टाकण्याचा प्रयत्न करून पहा बरे ! बघू कांही जमतं का ?" त्या मुलाने श्री वक्रतुंड शास्त्र्यांच्या प्रोत्साहनाने व साहाय्याने तसा यत्न केला. आश्चर्याची गोष्ट अशी की, भिंतीला धरुन धरुन पाच सात पावले कष्टाने टाकल्यावर त्याच्या पायात एकदम शक्ती आल्यासारखे होऊन तो भिंत सोडून सरळ चालू लागला. व थोड्याच दिवसात पूर्ण बरा झाला.

श्री मौनी स्वामी मार्गशीर्ष शु. ९ ला वाडीला समाधिस्त झाले. त्यावेळी श्री वक्रतुंड शास्त्री कर्ज फेडीसाठी काढलेल्या प्रवचनाच्या दौऱ्यावरच होते. पण त्यांना कांही आंतरिक संदेश मिळाला असावा. कारण पुढचे सर्व कार्यक्रम रहित करून ते घाईनें वाडीस परत येण्यास निघाले. पण पावसाच्या त्रासानें व रस्ते फारच खराब झाले असल्याने श्री मौनीस्वामी शांत होण्यापूर्वी ते वाडीला पोहचू शकले नाहीत व गुरुस्थानी असलेल्या श्री मौनीस्वामींची व त्यांची शेवटची भेट होऊ शकली नाही ! पण श्री मौनीस्वामी यांच्या निर्णयासंबंधी त्यांना कांही तरी दैवी सूचना मिळाली होती यात कांहीच संशय नाही. कारण मार्गशीर्ष शु. ९ ला सायंकाळी प्रवासात ते एकदम थांबले. सर्व मंडळींना जवळ बोलावून व दु:खित अन्त:करणाने ते म्हणाले "माझ्या प्रमाणे वाडीकडे तोंड करून नमस्कार करा व देवाचे नांव घ्या. आपले मौनीस्वामी शांत झाले आहेत !" सर्वांनी सांगितल्याप्रमाणे केले. पुढच्या मुक्कामावर पोहचल्यावर वाडीहून आलेली बातमी कळली की बरोबर नवमीला सायंकाळीच श्री मौनीस्वामी समाधिस्त झाले होते.

श्री वक्रतुंड शास्त्री पुराण उत्तम सांगत व रसाळ प्रवचने करीत. महाभारताचा त्यांचा सखोल अभ्यास होता. महाभारत त्यांना जवळजवळ मुखोद्गतच असे. त्यांना 'भारतीयबुवा' 'भारतीअण्णा' असेच सर्वजण म्हणत. गांवोगांवी त्यांना प्रवचन पुराणासाठी आग्रहाची निमंत्रणे येत व ते प्रवास पुष्कळ करीत. देऊळगांवराजा येथे प्रवचनासाठी ते पुष्कळदा येत. तेथे त्यांची पुष्कळ शिष्यशाखा समाजातील सर्व वर्गात होती. शिष्यांच्या व स्नेह्यांच्या आग्रहावरून पुढे ते देऊळगांव राजा येथेही वर्षातून काही काळ राहू लागले.

Scanned with AnyScanner

त्यांच्या एकनिष्ठ भक्त श्री. कुसाताई सावजी यांनी त्यांना शेती व घर दान दिले. त्यानंतर देऊळगांवराजा येथेच त्यांनी वास्तव्य केले.

श्री वक्रतुंड शास्त्री व्युत्पन्न संस्कृत पंडित होते. देऊळगांव राजा येथील श्री बालाजीच्या मंदिरासंबंधी भविष्योत्तर पुराणाच्या आधारे त्यांनी 'देवालय-ग्राम-माहात्य' नांवाचा बासष्ट अध्यायांचा संस्कृत ग्रंथ लिहिला आहे. त्यांना देऊळगांवराजा येथे फार मान असे नरसोबाच्या वाडीचे म्हणून त्यांना वाडीकर कवीश्वर म्हणत.

मेहकर येथील त्यांचे परमभक्त श्री सावजी यांना पुष्कळ वर्षे पुत्रसंतान नव्हते. श्री वक्रतुंड शास्त्र्यांनी त्यांच्यासाठी हरिवंशाची पारायणे केली व साहाव्यावर्षी श्री सावजी यांना पुत्ररत्न झाले.

पण श्री वक्रतुंड शास्त्री यांच्या आयुष्यातील एकच घटना त्यांच्यावरील ईश्वरानुग्रह व त्यांचा आराध्य देवतेशी कसा प्रत्यक्ष संबंध होता हे निर्विवाद सिद्ध करणारी आहे. राजसदन म्हणजे जालना भोकरदन मार्गावरील श्रीगणेशाचे क्षेत्र राजूर येथील प्रसंग अभूतपूर्व व विलक्षण चमत्कारच म्हणावा लागेल ! जालना येथील श्री. सुर्यकान्त दिगंबर कासार यांच्या घरच्या आजीबाईंनी तो प्रत्यक्ष डोळयांनी पाहिला असून चमत्कार म्हणून इतरांना सांगितला आहे. त्या दहा बारा वर्षांच्या असतांना आपल्या आजोबांबरोबर राजूरला श्रीगणेशाच्या दर्शनास गेल्या होत्या. तेथे श्री वक्रतुंड महाराज सहस्त्रावर्तनाच्या अभिषेकासाठी आलेले होते. अभिषेक संपल्यावर आरतीनंतर श्री वक्रतुंड महाराजांनी सर्वांना बाहेर लांब जाण्यास सांगितले. या बाईचे आजोबा बाहेरच, पण मंदिरातील दिसेल इतक्या अन्तरावर जरा बाजूला आपल्या नातीसह उभे राहिले. हल्ली राजूरला मंदिरात खुपच समया असतात. पण त्यावेळी पांच सातच असत व अंधार असे. धूपदीप मंत्रानंतर श्री वक्रतुंड शास्त्र्यांनी आपण एकटेच आहोत असे पाहून घेऊन श्रीगणेशासमोर प्रसादाचे ताट पुढे ठेवून भक्तीभावाने नैवेद्य दाखविला. तेव्हां श्रीगणरायाने चक्क सोंड वर करुन आवडत्या भक्ताचा तो प्रसाद ग्रहण केला !! हा चमत्कार वरील दहाबारा वर्षांची मुलगी व तिचे आजोबा यांनी डोळयांनी प्रत्यक्ष पाहिला आहे. यासुमारास आजोबांना ठसका आला. त्याबरोबर श्री वक्रतुंड महाराजांनी चटकन मागे वळून जरा रागावूनच प्रश्न केला 'सांगितल्याप्रमाणे तुम्ही लांब का गेला नाहीत ? बरं, झालं ते झालं आता येव्हडच लक्ष्यात ठेवा की हा प्रकार कुणालाही कधीही सांगायचा नाही !"

शके १८२९ मध्ये वाडीला प्लेगाची साथ आली. दुर्दैवाने त्या साथीत श्री वक्रतुंड शास्त्र्यांनाही प्लेग झाला. त्यावेळी श्री वक्रतुंड शास्त्र्यांनी संगमाजवळ कृष्णा तीरावर श्री दत्तमंदिरात पुराणांची पारायणे व प्रवचने सुरु केली होती व त्यापैकी पुष्कळ समाप्तही झाली होती. पती दुखण्यातून बरे व्हावेत म्हणून देवावर भार घालून त्यांच्या पत्नीने श्री दत्ताला रोज दोन माळांची प्रदक्षिणा घालण्याचा नियम केला होता. १०८ मण्यांच्या दोन माळाच जप करुन प्रदक्षिणा घालण्यास पुष्कळच फेरा घ्यावा लागत असे. अतिश्रमाने त्याही आजारी झाल्या. श्री वक्रतुंड महाराजांनी आपला आजार वाढतो आहे असे पाहून पत्नीमार्फत श्री धुंडिराज शास्त्र्यांना जवळ बोलावून घेतले. व कळकळीने उपदेश केला "कर्ज करणे फार वाईट ! मी या कर्जापायी फार कष्ट भोगलें. तू शक्य तितके मिळेल त्यातच खर्च भागवण्याचा यत्न कर. कर्ज कधीही काढू नकोस !"

श्री वक्रतुंड महाराजांनी श्री गणेशचतुर्थीच्या आदल्या दिवशी पत्नीला जवळ बोलावून सांगितले "उद्या चतुर्थी आहे. श्रीगणेशाची मूर्ती माझ्यासमोर बिछान्यापाशी आणून ठेव" त्या माऊलीने त्याप्रमाणे केल्यावर श्री वक्रतुंड महाराजांनी श्रीगणेशाचे अखंड नामस्मरण सुरु केले. या ध्यानधारणेतच तल्लीन असतांना दुसऱ्या दिवशी श्रीगणेश चतुर्थीच्या शुभ मुहूर्तावर सकाळी ८ चे सुमारास श्री वक्रतुंड महाराज श्रीगणेश चरणी विलीन झाले ! त्यांचा अन्तकाल अत्यंत शांत व प्रसन्न चित्तवृत्तीत झाला. यावेळी त्यांचे वय ६८ वर्षांचे होते. त्यांचा जन्म आश्विन वद्य ४ ला व निर्याणही श्रीगणेश चतुर्थीलाच झाले हा एक दैवी योगायोगच म्हणावा लागेल !

Scanned with AnyScanner

श्री वक्रतुंड शास्त्र्यांना जन्मापूर्वी त्यांच्या वडिलांचा शुभाशीर्वाद मिळालेला होताच. त्याचप्रमाणे त्यांच्या पूर्वजाला श्रीगणेशाचा शुभाशीर्वाद मिळालेला आहे की तुझ्या कुळात व्युत्पन्न, धर्मशील थोर विद्वान जन्मास येतील! श्री वक्रतुंड महाराजांचा उज्वल, पुण्यशील, परोपकारी व थोर जीवनक्रम पाहता श्री गणरायाचा वर प्रसाद पूर्ण फळाला आला होता यात शंका नाही!

# श्री धुंडिराज महाराज

असे विख्यात पंडित व सत्पुरुष श्री. धुंडिराज महाराजांना जनक म्हणून लाभले. श्री धुंडिराज महाराज यांचा जन्म ज्येष्ठ शुद्ध द्वितीयेस शके १८०८ मध्ये नरसोबाच्या वाडीला झाला. त्यांच्या वडिलांना श्री दत्तमूर्ती प्रसाद व बालक म्हणून मिळाली असल्याने श्री धुंडिराज महाराजांनाही लहानपणी ते 'दत्तू बाळ' अशीच हाक मारीत. श्री गोविंद स्वामींचा शुभाशीर्वाद उत्कृष्ट फळाला आला होता यात संशय नाही. श्री धुंडिराज महाराजांची जन्मकथाच गुरुप्रसादात्मक व अवतारसूचक आहे. वीस अपत्ये होऊन दोन मुलीशिवाय कोणीच न जगल्याने श्री वक्रतुंड शास्त्र्यांना संसाराचा वीट येऊन त्यांनी श्री गोविंद स्वामींना संन्यास दीक्षा देण्याची विनंती केली पण गुरुंनी श्री धुंडिराज महाराजांच्या अवताराची पूर्व कल्पना असल्याने त्यांनी शिष्याला परावृत्त करून दैवी सूचना म्हणून दत्तबाळाची मूर्ती दिली! हा कथाभाग मागे आलेला आहे. श्री धुंडिराज महाराजांचे विभूतिमत्व या जन्म कथेवरून उत्तम प्रतीत होते. त्यांच्या बालपणातला एक प्रसंगही चमत्कारच म्हणावा लागेल. त्यांच्या मातोश्रीं श्री सौ. सावित्रीबाईंचा दत्ताला प्रदक्षिणा घालण्याचा नियम मोठा कडक व अखंडीत होता एके दिवशी त्या नित्याप्रमाणे प्रदक्षिणा घालीत असतांना छोटा धुंडिराज कट्ट्यावर खेळत होता. खेळता खेळता तोल जाऊन हा बालक तीन चार पुरुष खोल अंतरावरुन कृष्णा नदीत पडला! एखाद्या आईने साहजिकच प्रदक्षिणा सोडून देऊन रडत ओरडत मुलाकडे धाव घेतली असती! पण ती वक्रतुंड महारांची पत्नी व धुंडिरांजांची माता होती! आपले आराध्य दैवत श्री दत्त गुरु आपली सत्व परीक्षाच पाहत आहेत हे ओळखून त्या धीरोदत्त साध्वीने विचलित न होता प्रदक्षिणा व सेवा अखंड न सोडता पुरी केली आणि नंतरच ती मुलाकडे धावली! तेव्हढ्या वेळात सगळीकडे आरडाओरड होऊन लोक खाली तीराकडे धावले होते. तो त्यांना अपूर्व व दिव्य दृश्य दिसले! आपली मैत्रिण देवाची सेवा करण्यात गुंतलेली असल्यामुळे तिचा टिल्ल्या कृष्णामाईने मांडीवर घेऊन तीं त्याला डोलवीत होती! येव्हढा लहान मुलगा इतक्या उंचीवरुन खोल नदीत पडल्यावर आपणहून वर उसळून येऊन जललहरीवर तरंगताना पाहून सर्वांना तो दैवी चमत्कारच वाटला! लोकांनी चटकन त्या बालकाला उचलून घेतले व 'प्रभूची लीला अगम्य आहे! तुमच्या दत्तात्रेय सेवेचा हा घ्या प्रसाद!' असे ध्यानोद्गार काढीत धुंडिराजांना सावित्रीबांईच्या ओटीत टाकले!

धुंडिराजांच्या फलटणच्या आजोबांना फार लळा होता. नातवाला मोठ्या आवडीने ते आपल्या गांवी घेऊन जात. पूजा, अर्चा, प्रदक्षिणा याच धुंडिराजांचा बाललीला असत. त्या पाहून सर्वांना मोठे आश्चर्य व कौतुक वाटे!

श्री धुंडिराज शास्त्री यांनी प्राथमिक अध्ययन वडिलांजवळ केले. त्यांचे शालेय शिक्षण वाडीचे श्री. दामोधर पन्त गोखले यांच्या वडिलांकडे झाले. नंतर वाडीला श्री. श्रीकृष्णशास्त्री वष्ट या विद्वत्संपन्न गुरुजीच्या संस्कृत शाळेंत वैदिक संहितेचे चौदा अध्याय, षोडश संस्कार, काव्य, अलंकार, छंद इत्यादींचा त्यांनी अभ्यास केला. कांही सांसारिक आपत्तीनें श्री श्रीकृष्ण शास्त्री वाडी सोडून इंदूरला रहाण्यास गेले तेव्हां आपल्या आवडत्या गुरुंकडे इंदूरला शिक्षणासाठी जाण्याचा श्री धुंडिराज शास्त्र्यांनी वडिलाजवळ हट्ट घेतला. पण त्यांचे वय यावेळी १४–१५ वर्षांचेच असल्याने वडील परवानगी देईनात. शेवटी मुलाने फारच आग्रह धरल्याने वडिलांनी श्रीकृष्ण शास्त्र्यांना पत्र लिहून अनुमती व खर्चाचा अंदाज विचारला. श्री श्रीकृष्ण शास्त्री श्री वक्रतुंड शास्त्र्यांना गुरुस्थानी मानीत. त्यांचे ताबडतोब उत्तर आले "आपली इच्छा आम्हा शिरसावंद्य आहे. धुंडिराज आमचाच आहे. त्याला अवश्य पाठवा. खर्चाचे पाहून घेऊ" यानंतर आणखी तीन विद्यार्थी वाडीहून इंदूरला शिक्षणास

जाण्यासाठी निघाले. म्हणून वाडीची ही चार मुले इंदुरला संस्कृत शिकण्यासाठी गेली.

श्री धुंडिराज शास्त्र्यांनी श्री. श्रीकृष्ण शास्त्र्यांजवळ न्यायशास्त्र, वाक्वृत्ती, पंचलक्षणे, सामान्य निवृत्ती इत्यादींचे उत्कृष्ट अध्ययन केले. श्री सखाराम शास्त्री टिल्लू यांच्या स्मरणार्थ घेतल्या जाणाऱ्या कसोटीच्या परीक्षेत ते उत्तम प्रकारे उत्तीर्ण होऊन त्यांना होळकर शिष्यवृत्ती मिळाली ते इंदूर येथील सरस्वती पूजनाच्या उत्सवातही प्रामुख्याने भाग घेत असत. पुढे श्री चिकोडीकर शास्त्र्यांजवळही त्यांनी न्यायशास्त्राचा उत्तम अभ्यास केला. इंदूरला त्यावेळी श्री नारायण शास्त्री जेरे त्यांचे सहाध्यायी होते.

पण इंदूरला त्यावेळी प्लेगची साथ जोराने सुरु झाल्यामुळे सुमारे वर्षभरच इंदूरला राहून श्री धुंडिराज शास्त्री वाडीला परत आले नंतर त्यांची बहीण श्री. सौ. नर्मदाबाई ही सांगलीला दिलेली होती तिच्याकडे सांगलीला ते पुढील अध्ययनासाठी गेले. सांगली संस्थानच्या अधिपतींना वेदान्त व संस्कृत याविषयीं फार अभिमान व प्रेम होते. त्यांच्या उत्तेजनाने व आश्रयाने सांगलीला न्याय, व्याकरण, वेद यांचे शिक्षण देणाऱ्या निरनिराळ्या पाठशाळा स्थापन झाल्या होत्या. श्री धुंडिराज शास्त्री यांनी न्याय व व्याकरण या दोन्ही पाठशाळांत शिक्षण घेतले. सांगलीच्या दोन तीन वर्षाच्या मुक्कामात श्री. व्यंकट रमणाचार्य यांच्यासारख्या विद्वान व अधिकारी प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी सिद्धान्त कौमुदी मनोरमा, मुक्तावली, व्याकरण व न्यायशास्त्र यावरील ग्रंथांचा अभ्यास पूर्ण केला. पुढे इंदुरला वे. शा. सं. श्रीराम शास्त्री वाळवेकर यांच्याकडेही त्यांनी न्यायशास्त्र, वाक्वृत्ती, पंचलक्षणे सामान्य निवृत्ती इत्यादींचा परिश्रमपूर्वक अभ्यास केला.

येणें प्रमाणे श्री धुंडिराज महाराज यांनी वेद वेदान्तांचे, धर्मशास्त्राचे व काव्यालंकार आणि न्याय शास्त्राचे विद्यार्थी दशेत उत्कृष्ट अध्ययन केले आहे.

शेवटी एकदा त्यांना म्हणाले 'आता अध्ययन पुरे झाले. तू चांगला तयार झाला आहेस. परीक्षा देण्यातच काय ठेवले आहे ? तू आता पुराण सांगण्याचा व प्रवचन करण्याचा वडिलोपार्जित व्यवसाय सुरु कर. माझी जागा आता तू घे."

वडिलांच्या आज्ञेनुसार श्री धुंडिराज शास्त्र्यांनी अध्ययन पुरे करुन पुराण सांगण्यास प्रारंभ केला. श्री दत्ताची पूजा होऊन मूर्ती पोशाख घालून पालखीत बसवीपर्यंत श्री वक्रतुंड महाराज नियमाने मंदिरात पुराण सांगत असत. ते कार्य श्री. धुंडिराज शास्त्र्यांनी आपल्याकडे घेतले.

श्री धुंडिराज शास्त्र्यांनी अथर्वशीर्षाची व श्री गुरु चरित्राची अनेक पारायणे केली आहेत. त्यांच्या वडीलांनी त्यांना श्रीगणेशाची व त्यांच्या पत्नीला श्री देवीची उपासना दिली आहे. श्री धुंडिराज शास्त्र्यांनी पुरश्चरण-युक्त जप पुष्कळ केला आहे. त्यांना स्वप्नात इष्ट देवतेचे पुष्कळदा दर्शन घडलेले आहे. स्वप्नात अधिकारी ब्राम्हण दर्शन देऊन त्यांना मंत्र देत व आश्वासनपूर्वक सांगत "हा जप चालू ठेव म्हणजे सर्व ठीक होईल. तुला कृपाप्रसाद मिळेल !" एकदा जप समाप्तीनंतर पुरश्चरण संपल्यावर त्यांना स्वप्नात एक तेजस्वी विप्र दिसला व त्याने हिरव्या व पिकलेल्या अंब्याची टोपली त्यांच्यापुढे ठेवली. त्याचा स्पष्ट अर्थ होता की "व्रतानुष्ठान पक्व होत चालले आहे. पण अजून थोडा कच्चा माल आहे. धीर धरावा व क्रम चालू ठेवावा."

ब्रम्हचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज. श्री रंगनाथ महाराज व श्री गुळवणी महाराज यांच्या दर्शनाचा लाभ श्री धुंडिराज शास्त्र्यांना झालेला असून त्यांचा कृपाप्रसादही मिळालेला आहे. श्री टेंबेस्वामी यांचा श्री धुंडिराज शास्त्र्यांवर विशेष लोभ असे. श्री टेंबेस्वामी यांचा मुक्काम वर्षातून तीन चार महिने वाडीला असे. त्यांच्या आज्ञेनुसार श्री धुंडिराज शास्त्र्यांनी वाडीला कांही काळ संस्कृत पाठशाळाही चालविली होती. त्यांनी एकदा श्री धुंडिराज शास्त्र्यांना एक पुरश्चरणयुक्त जप करण्यास सांगितले. त्यावेळी शुभ प्रारंभकाल, संकल्प, विधी वगैरे सर्व सांगून हविष्याचे भोजन, सीमोल्लंघन वर्ज्य वगैरे नियमही पाळण्यास सांगितले. श्री धुंडिराज शास्त्र्यांनी याप्रमाणे कांही महीने व्रतस्थ राहून यथाशास्त्र जप केला. पण एके दिवशी मात्र त्यांना जरुरीच्या कामासाठी अन्य ठिकाणी अनिच्छेने जावेच लागले. आपल्या हातून सीमोल्लंघनाचा दोष घडला याबद्दल त्यांना फार खंत वाटली. त्यांनी श्री टेंबेस्वामी यांना सगळी

हकीगत कळवून क्षमा मागितली व घडलेल्या दोषावर उपाय व प्रायश्चित विचारले. स्वामींचे लगेच उत्तर आले 'कांही चिंता करू नये. या दोषाने कांही विशेष बिघडले नाही. वाईट वाटते आहे व अनिश्छेने दोष घडला यात सर्व परिमार्जन आले !"

श्री टेंबे स्वामी यांच्याकडे पुष्कळ भक्त संकट निवारणार्थ येत. एकदा एक श्रीमंत व्यापारी त्यांच्या दर्शनास आला. त्याची मुले वाचत नव्हती. संतती वाचत नसल्याने गडगंज श्रीमंतीतही त्याला काहीच सुख लाभत नव्हते. स्वामींनी त्याची व्यथा ऐकून घेतल्यावर क्षणभर डोळे मिटून ध्यान केले व नंतर ते म्हणाले "तुमच्या घरातील संपत्ती ज्या पुरुषाची आहे तो पिशाच्च होऊन त्या संपत्तीवर बसला आहे. तो तुम्हाला सांसारिक पीडा देत आहे म्हणून तुम्ही श्रीविष्णुसहस्त्रनामाची १६०० पारायणे वैदिक ब्राम्हणाकडून करा व यथाशास्त्र सांगता व दानधर्म करा. म्हणजे संतती वाढेल." त्या गृहस्थाने सांगितल्याप्रमाणे सर्व यथासांग करून दानही दिले. त्यानंतर एक दोन वर्षातच त्या शेठजीस संतती होऊन ती दीर्घायुषी झाली.

श्री धुंडिराज महाराज यांचा त्या कालानुसार १८ व्या वर्षी शके १८२६ मध्ये विवाह झाला. सिरहट्टी येथील श्री गोपाळराव हृणमसागर यांची कन्या गंगू ही वधू म्हणून निवडली होती. नव-वधूचे नांव श्री. सौ. सरस्वतीवाई असे ठेवण्यात आले.

श्री. धुंडिराज महाराज यांना पुष्कळ वर्षे संतती होत नव्हती. त्यामुळे त्यांची पत्नी साहजिकच नेहमी कष्टी असे. याबावतीत त्यांनी श्री. टेंबे स्वामींना पत्र लिहिले. स्वामींचे सविस्तर उत्तर आले. त्यात धर्मसिन्धूत दिलेल्या मंत्राचा जप व विधिविधान व होम हवन करण्यास सांगितले होते. ते सर्व यथास्थित केल्यावर श्री धुंडिराज शास्त्री यांना संतती लाभली.

श्री धुंडिराज शास्त्र्यांनी मोरगांवपासून सहकुटुंब काशीयात्रा केली आहे. काशीला त्यांचा मुक्काम सुमारे २७-२८ दिवस होता. श्रीविश्वनाथाची यथासांग पूजा व श्री गुरु चरित्र पारायण करून व गोकुळ, वृन्दावन, मथुरा इत्यादि देवस्थानांचे दर्शन घेऊन ते परत आले. श्री टेंबेस्वामी यांच्या दर्शनार्थ त्यांनी श्री गरुडेश्वराचीही यात्रा केली त्यावेळी त्यांचे दहा वर्षांचे सुपुत्र श्री दत्त महाराज हेही बरोबर होते.

श्री धुंडिराज महाराजांच्या विभूतिमत्वात त्यांच्या पत्नी श्री. सौ. सरस्वतीबाई यांचा फार मोठा वाटा आहे. तशी प्रत्येक पत्नीच पतीची अर्धांगी व अर्धा वाटा घेणारी असते. पण श्री. सौ. सरस्वतीबाई आपल्या पतीच्या कार्यात पूर्णपणे समरस झालेल्या तर होत्याच. पण त्यांचे स्वतःचे स्वतंत्र व्यक्तिमत्वही होते. सगळे परिचयाचे लोक त्यांना 'आईसाहेब' म्हणूनच ओळखत व तसा मान देत.

• • •

। श्री ।

# श्री. सौ. आईसाहेब (श्री. सौ. सरस्वतीबाई)

श्री धुंडिराज महाराजांच्या पत्नी श्री. सौ. आईसाहेब या फार देवभक्त, पतिनिष्ठ थोर अन्तःकरणाच्या व दैवी संपत्तीचे वरदान असलेल्या होत्या. श्री धुंडिराज महाराजांना शोभणारीच त्यांची पत्नी होती !

श्रीं. सौ. आईसाहेबांचे धार्मिक आचरण व पुजा अर्चा फार कडक व अखंडित असे. वाडीला समाधीला प्रदक्षिणा घालण्याचा आपल्या सासूबाईंचा नियम त्यांनीही अखंडित सुरु ठेवला होता. सुर्योदयापूर्वी स्नान करुन त्या श्री दत्ताला १०८ प्रदक्षिणा घालीत. मुले त्रास देऊ लागली तर त्यांना श्री दीक्षित महाराजांकडे सोपवून त्या आपल्या प्रदक्षिणा पुऱ्या करीतच. हा विषय सहज निघाला की श्री दत्त महाराज सद्गदित व कृतज्ञ अंतकरणाने सांगतात "आमचे जे काय सुदैव असेल ते आईच्या भजनाचे फळ आहे ! आम्हाला सद्भाव व संतसंगती लाभली ही आईचीच कृपा होय !" शिवलीलामृत, व्यंकटेश स्तोत्र, श्री गजानन महाराज, लोणीचे श्री सखाराम महाराज यांच्या पोथ्यांचे पारायण अखंडित चालूच असे लोणीला त्यांनी एकदा श्री सखाराम महाराजांच्या

मंदिरात वाङनिश्चय, सीमान्त पूजन वगैरे सर्व यथाशास्त्र करून तुलसीचा विवाह साजरा केला व उखळ मुसळ जाते, वस्त्राप्रावरणे, भांडीकुंडी असा सगळा प्रपंच वाहिला. प्रवासातही श्री गुरु चरित्र व श्रीगणेश मूर्ती मांडून त्या प्रदक्षिणा घालीत. भल्या पाहटे स्नान करण्याचा त्यांचा नियम कधी चुकला नाही. दर शनिवारी न्हायचे, माघी पौर्णिमेला मंगलस्नान करायचे असे त्यांचे पुष्कळ नियम होते.

त्या अतिशय साध्या स्वभावाच्या व आतिथ्यशील असत. कोणी भक्त सहकुटुंब दर्शनासाठी किंवा प्रवासात त्यांच्या घरी उतरले तर वृद्धपणींही त्या भक्तांच्या स्त्रियांना काम करु न देता स्वत: सगळे करून वाढीत व हसत म्हणत "अग ! तुम्ही माहेरवाशणी आल्या आहांत ना ? तुम्ही नाही कशाला हात लावायचा !" वयोमानानें त्यांचे सांधे व पाय नेहमी दुखत. पण भक्ताची अडचण किंवा दुर्घटना कळताच त्यांच्या गांवी जाऊन समाचार घेत व गांवातही कशाबशा चालत जाऊन व जिना चढूनही त्या मंडळीचा समाचार घेत.

श्री धुंडिराज महाराजांच्या प्रमाणेच त्यांच्यावरही ईश्वरी अनुग्रह व अंगी दैवी शक्ती होती यात संशय नाही. श्री महाराजांच्या सहस्त्रचन्द्रदर्शनाच्या महोत्सवात सुवासिनी व कुमारिका यांची पुजा करून त्यांना १०८ लुगडी व खण श्री. सौ. आईसाहेबांनी अर्पण केली. अन्नदान किती झाले याला गणतीच नाही. भक्तांच्या आलेल्या लोंढ्याला अन्न पुरेल ना, अशी व्यवस्थापकांना साहजिकच चिंता वाटे. अवभृत स्नानाच्या दिवशी मुदपाकखान्याजवळ सहज ही बोलणी चालली असताना आईसाहेब श्री. दत्त महाराजांना एकदम म्हणाल्या "दत्ता ! भंडाऱ्याच्या प्रत्येक पातेल्यात या अक्षता टाक वरं ! कसं पुरत नाही मी पाहते !" आश्चर्य असे की त्या दिवशी २५-२५, ३०-३० हजारांच्या पंगतीला अन्न पुरतंच गेलं ! कशाचाही तुटवडा आलाच नाही !

त्या महान पतिव्रता होत्या. पतीची त्या देवाप्रमाणे सेवा करीत. श्री धुंडिराज महाराज जरा जास्त आजारी झाले व भोवतालचे लोक काळजी करु लागले की, त्या म्हणत "अरे ! मी आधी जाणार हे ठरलेले आहे. मी वडद्याकट आहे ना ! मग त्यांची कशाला काळजी ? अनेक संताचे आशीर्वाद फुकट कसे जातील ?" इतर वेळीही प्रसंग विशेषी त्या सांगत 'मी अहेवपणी महाराजांच्या सान्निध्यातच जाणार व तेच माझं पुढच सगळं करतील ध्यानात ठेवा !' त्या महासतीचे शब्द अक्षरश: खरे ठरले !

सुलतानपूरला त्यांचे भाचे श्री. अष्टीकर यांना उपदेश घ्यायचा होता म्हणून श्री धुंडिराज महाराज व श्री. सौ. आईसाहेब ही दोघे तेथे गेली होती. मंत्रोपदेश द्यायच्या दिवशी त्या आजारी झाल्या. म्हणून श्री धुंडिराज महाराजांनी पर्याय काढला की 'मी एकटाच मंत्र देतो व आपण परत जाऊ' पण सौ. आईसाहेबांना ते पसंत पडले नाही. त्यांना मृत्यु कळला होता. किंवा त्या इच्छा मरणी होत्या की काय कोण जाणे ! पण त्यांनी तेथेच रहायचे ठरविले. माघ शुद्ध चतुर्थीला अंगात खूप ताप असतानाही शनिवारचा नियम म्हणून त्या न्हायल्या. त्या आजारातच पतीच्या मांडीवर त्यांचा अंत झाला ! पुढची हकीगतही चमत्कारासारखीच आहे. 'पतीच्या सान्निध्यात मी आधी जाणार याप्रमाणेच पतीच माझे और्ध्वदेहिक करतील असे त्या म्हणाल्या होत्या. त्यांना वाचासिद्धी असावी. सतीचे बोल खोटे कसे ठरतील ? त्यांच्या निधनाची वार्ता त्यांच्या मुलांना व देऊळगांव राजा येथे तावडतोब कळविण्यात आली. सौ. आईसाहेबांचा अंत्य संस्कार आपल्याच गांवी झाला पाहीजे असा देऊळगाव राजामधील एकनिष्ट भक्तांचा आग्रह पडून सौ. आईसाहेबांचा देह सुलतानपूरहून आणण्यासाठी प्रमुख मंडळी स्वतंत्र मोटार घेऊन लगेच सुलतानपूरला गेली. श्री दत्तमहाराजही आपल्या गांवाहून सुलतानपुरला जाण्यासाठी तातडीने निघून देऊळगांव राजाला आले. तेथे त्यांना साहजिकच सांगण्यात आले की 'सुलतानपूरला जाण्याची कांहीच आवश्यकता नाही. कारण लवकरच स्वतंत्र मोटारने श्री. सौ. आईसाहेबांचा देह देऊळगाव राजा येथे आणण्यात येत आहे' श्री दत्तमहाराजांना ते पटून ते देऊळगांव राजा येथेच वाट पहात थांबले. इकडे मोटारच व मंडळी सुलतानपूरला आल्यावर तेथे थोडा वाद झाला. सुलतानपूरकरांचे म्हणणे पडले की जेथे अंत झाला तेथेच अंत्य संस्कार व्हावेत. श्री धुंडिराज महाराजांनी तो पक्ष मान्य केल्याने श्री सौ. आईसाहेबांचे सर्व आर्ध्वदेहिक श्री धुंडिराज महाराजांनाच करावे लागले व त्या साध्वीचे

Scanned with AnyScanner

मंदिरात वाङनिश्चय, सीमान्त पुजन वगैरे सर्व यथाशास्त्र करून तुलसीचा विवाह साजरा केला व उखळ मुसळ जाते, वस्त्राप्रावरणे, भांडीकुंडी असा सगळा प्रपंच वाहिला. प्रवासातही श्री गुरु चरित्र व श्रीगणेश मूर्ती मांडून त्या प्रदक्षिणा घालीत. भल्या पाहटे स्नान करण्याचा त्यांचा नियम कधी चुकला नाही. दर शनिवारी न्हायचे, माघी पौर्णिमेला मंगलस्नान करायचे असे त्यांचे पुष्कळ नियम होते.

त्या अतिशय साध्या स्वभावाच्या व आतिथ्यशील असत. कोणी भक्त सहकुटुंब दर्शनासाठी किंवा प्रवासात त्यांच्या घरी उतरले तर वृद्धपणींही त्या भक्तांच्या स्त्रियांना काम करु न देता स्वतः सगळे करून वाढीत व हसत म्हणत "अग ! तुम्ही माहेरवाशणी आल्या आहांत ना ? तुम्ही नाही कशाला हात लावायचा !" वयोमानानें त्यांचे सांधे व पाय नेहमी दुखत. पण भक्ताची अडचण किंवा दुर्घटना कळताच त्यांच्या गांवी जाऊन समाचार घेत व गांवातही कशाबशा चालत जाऊन व जिना चढूनही त्या मंडळीचा समाचार घेत.

श्री धुंडिराज महाराजांच्या प्रमाणेच त्यांच्यावरही ईश्वरी अनुग्रह व अंगी दैवी शक्ती होती यात संशय नाही. श्री महाराजांच्या सहस्त्रचन्द्रदर्शनाच्या महोत्सवात सुवासिनी व कुमारिका यांची पुजा करून त्यांना १०८ लुगडी व खण श्री. सौ. आईसाहेबांनी अर्पण केली. अन्नदान किती झाले याला गणतीच नाही. भक्तांच्या आलेल्या लोंढ्याला अन्न पुरेल ना, अशी व्यवस्थापकांना साहजिकच चिंता वाटे. अवभृत स्नानाच्या दिवशी मुदपाकखान्याजवळ सहज ही बोलणी चालली असताना आईसाहेब श्री. दत्त महाराजांना एकदम म्हणाल्या "दत्ता ! भंडाऱ्याच्या प्रत्येक पातेल्यात या अक्षता टाक बरं ! कसं पुरत नाही मी पाहते !" आश्चर्य असे की त्या दिवशी २५-२५, ३०-३० हजारांच्या पंगतीला अन्न पुरतंच गेलं ! कशाचाही तुटवडा आलाच नाही !

त्या महान पतिव्रता होत्या. पतीची त्या देवाप्रमाणे सेवा करीत. श्री धुंडिराज महाराज जरा जास्त आजारी झाले व भोवतालचे लोक काळजी करु लागले की, त्या म्हणत "अरे ! मी आधी जाणार हे ठरलेले आहे. मी धडधाकट आहे ना ! मग त्यांची कशाला काळजी ? अनेक संतांचे आशीर्वाद फुकट कसे जातील ?" इतर वेळीही प्रसंग विशेषी त्या सांगत 'मी अहेवपणी महाराजांच्या सान्निध्यातच जाणार व तेच माझं पुढच सगळं करतील ध्यानात ठेवा !' त्या महासतीचे शब्द अक्षरशः खरे ठरले !

सुलतानपूरला त्यांचे भाचे श्री. अष्टीकर यांना उपदेश घ्यायचा होता म्हणून श्री धुंडिराज महाराज व श्री. सौ. आईसाहेब ही दोघे तेथे गेली होती. मंत्रोपदेश घ्यायच्या दिवशी त्या आजारी झाल्या. म्हणून श्री धुंडिराज महाराजांनी पर्याय काढला की 'मी एकटाच मंत्र देतो व आपण परत जाऊ' पण सौ. आईसाहेबांना ते पसंत पडले नाही. त्यांना मृत्यु कळला होता. किंवा त्या इच्छा मरणी होत्या की काय कोण जाणे ! पण त्यांनी तेथेच रहायचे ठरविले. माघ शुद्ध चतुर्थीला अंगात खूप ताप असतानाही शनिवारचा नियम म्हणून त्या न्हायल्या. त्या आजारातच पतीच्या मांडीवर त्यांचा अंत झाला ! पुढची हकीगतही चमत्कारासारखीच आहे. 'पतीच्या सान्निध्यात मी आधी जाणार याप्रमाणेच पतीच माझे और्ध्वदेहिक करतील असे त्या म्हणाल्या होत्या. त्यांना वाचासिद्धी असावी. सतीचे बोल खोटे कसे ठरतील ? त्यांच्या निधनाची वार्ता त्यांच्या मुलांना व देऊळगांव राजा येथे ताबडतोब कळविण्यात आली. सौ. आईसाहेबांचा अंत्य संस्कार आपल्याच गांवी झाला पाहींजे असा देऊळगाव राजामधील एकनिष्ट भक्तांचा आग्रह पडून सौ. आईसाहेबांचा देह सुलतानपूरहून आणण्यासाठी प्रमुख मंडळी स्वतंत्र मोटार घेऊन लगेच सुलतानपूरला गेली. श्री दत्तमहाराजही आपल्या गांवाहून सुलतानपुरला जाण्यासाठी तातडीने निघून देऊळगांव राजाला आले. तेथे त्यांना साहजिकच सांगण्यात आले की 'सुलतानपूरला जाण्याची कांहीच आवश्यकता नाही. कारण लवकरच स्वतंत्र मोटारने श्री. सौ. आईसाहेबांचा देह देऊळगाव राजा येथे आणण्यात येत आहे' श्री दत्तमहाराजांना ते पटून ते देऊळगांव राजा येथेच वाट पहात थांबले. इकडे मोटारच व मंडळी सुलतानपूरला आल्यावर तेथे थोडा वाद झाला. सुलतानपूरकरांचे म्हणणे पडले की जेथे अंत झाला तेथेच अंत्य संस्कार व्हावेत. श्री धुंडिराज महाराजांनी तो पक्ष मान्य केल्याने श्री सौ. आईसाहेबांचे सर्व आर्ध्वदेहिक श्री धुंडिराज महाराजांनाच करावे लागले व त्या साध्वीचे

शब्द खरे ठरले ! सुलतानपूर येथे त्यांच्या समाधीवर चौथरा व छत्री बांधली असून माघ पौर्णिमेला श्री. सौ. आईसाहेबांची पुण्यतिथी दरवर्षी साजरी केली जाते व मळयात अभिषेक, पूजा व अन्नदान हे सर्व कार्यक्रम व्यवस्थित होतात.

श्री धुंडिराज महाराजांचा विवाह झाल्यावर दोन तीन वर्षातच श्री वक्रतुंड शास्त्री यांनी देऊळगांव राजा येथे बिऱ्हाड केले. त्यामुळे वयाच्या २०–२१ व्या वर्षी श्रीं धुंडिराज महाराज देऊळगांव राजा येथे रहाण्यास आले.

श्री धुंडिराज महाराज पुराण प्रवचनें यासाठी पूर्वी पुष्कळ प्रवास करीत. ते वर्षातून कांही काळ वाडीलाही आपल्या घरी रहात. बार्शी, खर्डे उर्फ शिव पट्टम इत्यादि अनेक ठिकाणी ते प्रवचनासाठी जात. अलीकडच्या काळात त्यांचे वास्तव्य देऊळगांव राजा व जालना येथेच असते.

देऊळगांव राजा येथे आल्यावर श्री धुंडिराज महाराजांनी तेथे पुराण सांगण्यास प्रारंभ केला. त्यांचे वडील श्री वक्रतुंड शास्त्री गुरुमंत्र देत. श्री धुंडिराज महाराजांनी आपल्या वडिलांकडूनच गुरुमंत्र घेतला आहे. मुंजीच्या वेळी सगळेच वडील आपल्या मुंजा मुलाला गायत्री मंत्र देतात. पण गुरुमंत्र देण्यास अधिकारी पुरुष स्वतःचे वडीलच लाभावेत हे श्री धुंडिराज महाराजांचे परमभाग्य समजले पाहिजे ! गुरुमंत्र देण्याचा अधिकार व पात्रता येण्यासाठी जे अनुष्ठान व विधीविधान करावे लागते ते वडिलांनी त्यांच्याकडून सशास्त्र करवून घेऊन त्यांनाही गुरुमंत्र देण्याची अनुज्ञा दिली. तेव्हांपासून श्री धुंडिराज महाराज यांची शिष्य शाखा निरनिराळ्या गांवी व विशेषतः मराठवाड्यात पुष्कळच पसरली आहे.

देऊळगांव राजा येथे श्री धुंडिराज शास्त्र्यांना फार मान आहे. त्यांना श्री. धुंडिराज महाराज असेच सर्वजण म्हणतात. श्री बालाजी साहेबांच्या नवरात्र उत्सवात व ळळीतात श्री. राजेसाहेब, विद्वान ब्राम्हण व पुजारी यांचे वेगवेगळे मान ठरलेले आहेत. त्यात श्री धुंडिराज महाराजांचे विशेष मान आहेत.

श्री धुंडिराज महाराज यांना पांच पुत्र व एक कन्या अशी अपत्ये झाली. श्री. दत्त महाराज हे त्यांचे ज्येष्ठ पुत्र होत. त्यांच्या पाठीवरचे श्री. दिगंबरपंत हे आयुर्वेद तीर्थ असून कोल्हापूरकडे नेसरीला असतात. त्यानंतरचे श्री. वासुदेवराव जालन्याला असतात. त्यांच्या कन्या सौ. पद्मावतीबाई या सांगलीला कुळकर्ण्यांकडे दिल्या आहेत. त्यांच्या पाठचे श्री. यादवराव हे बी. ए. व काव्यतीर्थ व संस्कृत प्रचारक असून मुंबईला अंधेरीस राहतात. सगळ्यात धाकटे श्री. गजाननराव हे लवकर वारले.

श्री. दत्त महाराजांच्या बद्दल थोडीशी माहिती दिल्याशिवाय श्री धुंडिराज महाराज यांच्या चरित्राला परिपूर्णता येणार नाही.

• • •

। श्री ।

# श्री दत्त महाराज

श्री धुंडिराज शास्त्र्यांना चार मुले व एक मुलगी अशी अपत्ये आहेत. त्यांच्या चार पुत्रांपैकी श्री दत्त महाराज कवीश्वर हे विख्यात पंडित व धर्मशास्त्रवेत्ते म्हणून प्रसिद्ध आहेत. श्री दत्त महाराजांचा जन्म वाडी येथे शके १८३१ मध्ये माघ वद्य ६ ला झाला. त्या वेळी त्यांच्या मातोश्री गरोदर राहिल्याचे लक्षात येताच श्री धुंडिराज शास्त्रींनी मुलगाच होणार या श्रद्धेने पुंसवन, सीमन्त वगैरे सर्व संस्कार यथाशास्त्र केले.

त्यांच्या बालपणीच त्यांचे उज्वल भविष्य थोर विभूतीने उद्घोषित केले आहे. अगदी लहानपणी श्री वासुदेवानन्द सरस्वती यांच्या दर्शनास नेले असताना या गोजिरवाण्या बालकाकडे पाहून त्यांनी उद्गार काढले 'आपले उर्वरित कार्य पुरे करण्यासाठी श्री वक्रतुंड शास्त्रीच अवतरलेले आहेत बरं !'

श्री दत्त महाराजांचा व्रतबंध वाडी येथे शके १८३८–३९ मध्ये झाला. वाडी येथेच सध्याचे संकेश्वर पीठाचे श्री. शंकराचार्य (पूर्वाश्रमीचे वे. शा. सं. श्री शंकर शास्त्री जेरे) यांचेपाशी त्यांचे व्याकरणापर्यंत शिक्षण झाले. त्यानंतर सांगलीला व्याकरण शाळेत वे. शा. सं. श्री व्यंकटेश शास्त्री अभ्यंकर

Scanned with AnyScanner

यांच्याकडे व्याकरणाचे अध्ययन त्यांनी पूर्ण केले. पुढे धारवाड येथे श्री. नागेश शास्त्री उप्पन बेटगिरी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी बाधान्त अध्ययन केले. याप्रमाणे वेदवेदान्त, न्याय, व्याकरण, अलंकार इत्यादी सर्व शास्त्रांचे त्यांनी उत्कृष्ट व परिपूर्ण अध्ययन केले आहे. त्यांनी पुणे, म्हैसूर, बडोदा इत्यादी ठिकाणच्या शास्त्रांच्या परीक्षा दिल्या असून उत्कृष्ट यश मिळविले आहे.

श्री दत्त महाराज यांची बुद्धी कुशाग्र असून ते एकपाठी आहेत. अवघ्या सोळाव्या वर्षी त्यांनी श्रीमद्भागवताचा प्रथम सप्ताह केला. त्यावेळी परमपूज्य श्री. दीक्षित स्वामी महाराज सप्ताहास हजर असत. त्यानंतर श्री दत्त महाराजांनी भागवताचे शेकडो सप्ताह केले आहेत.

वेद वेदान्ताचे, काव्यालंकाराचे व धर्मशास्त्राचे उत्कृष्ट अध्ययन करून बहोत झाल्यावर श्री दत्त महाराज पू. पाद. श्री शंकराचार्य मठातील अध्यापन शाळेत प्राध्यापक झाले. नंतर टिळक महाविद्यापीठात न्याय वेदान्ताचे अध्यापक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. अध्यापनाचे कार्य करीत असतांना त्यांचे प्राचीन ग्रंथ परिशीलन, संशोधन, पुराण वाचन व प्रवचन कार्य चालूच असे. सेवाधर्म व लोक शिक्षण हे त्यांचे कार्य अखंडीत चालू असते. त्यांचा उचित गौरव अनेक संस्थाकडून व श्रेष्ठ व्यक्तीकडून वेळोवेळी झालेला आहे. शासनाकडून त्यांचा अनेकदा सन्मान होऊन 'राष्ट्रीय पंडित', 'न्याय रत्न' 'विद्यावाचस्पती' इत्यादी पदव्या त्यांना मिळालेल्या आहेत. उत्तम संस्कृत शिक्षक' म्हणून डॉ. राजेन्द्रप्रसाद यांच्या हस्ते त्यांचा सन्मान झाला. तसेच दोन तीन वेळा भारत राष्ट्रपतीकडून सत्कार झाला. राष्ट्रपती श्री. गिरी यांच्या शुभहस्ते १९७० साली संस्कृत पंडित म्हणून त्यांना 'विद्यावाचस्पति' ही पदवी देण्यात आली.

पण श्री दत्त महाराज हे फारच प्रसिद्धीपराण्मुख व वडिलांची आज्ञा शिरसावंद्य मानणारे आहेत. त्या सुमारास श्री. बाबु सावजी यांचे घरी सप्ताह चालू होता म्हणून व कशाला इतक्या लांब जायचे ? असे वडील म्हणल्यावरून श्री. दत्त महाराज या पदवीदान समारंभास दिल्लीस प्रत्यक्ष हजर राहीले नाहीत. वाडी येथे श्री दत्त ट्रस्टच्या वतीने श्री. हरीभाऊ पाटसकर यांच्या अध्यक्षतेखाली प. पू. श्री. गुळवणी महाराजांच्या शुभहस्ते श्री. दत्त महाराजांचा सत्कार झाला आहे. शासनातर्फे त्यांना वर्षासन देण्यात आले आहे. विजयवाडा, तिरुपती, धारवाड. काशी येथील विद्वज्जनांच्या परिषदेत त्यांनी प्रामुख्याने भाग घेतला आहे. कांची काम कोटी पीठाचे प. पू शंकराचार्य यांच्या हस्ते त्यांना सुवर्ण कटक अर्पण करण्यात आला आहे. प. पू. श्री. गुळवणी महाराजांचा त्यांच्यावर कृपा प्रसाद असून श्री. वासुदेव निवासाच्या पीठाचे श्री. गुळवणी महाराजांच्या नंतर पीठाधिपति म्हणून त्यांचीच नियुक्ती झाली आहे.

श्री. दत्त महाराज यांना सरस्वतीचे वरदान असून ओघवत्या वाणीने विषय प्रतिपादन करण्याची त्यांची शैली अवर्णनीय आहे. पू. निंबाकाचार्य यांच्या द्वैताद्वैतसिद्धान्तावरील वेदान्त पारिजात सौरभ या ग्रंथाचा त्यांनी अनुवाद केला असून तो ग्रंथ प्रसिद्ध आहे पू. माधवाचार्य यांच्या सर्व दर्शन संग्रहावरही त्यांनी मौलिक टीका लिहिली आहे. शृंगेरीपीठाचे श्रीशंकराचार्य पू. पा. अभिनव विद्यातीर्थ स्वामी यांच्यासारख्या थोर विभूतीचे पुण्यास आगमन झाले म्हणजे प्रथम पाद्य पुजेचा मान श्री. दत्त महाराजांचा आहे. महामहोपाध्याय पं. श्रीधर अण्णा शास्त्री बारे यांचा नाशिक येथे मोठा सत्कार झाला त्यावेळी अध्यक्षपदी श्री. दत्त महाराज यांचीच नियुक्ती करण्यात आली होती. हॉवर्ड युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर रंगाल हे वेदान्ताच्या अध्ययनासाठी मुद्दाम श्री. दत्त महाराजांच्या सान्निद्यात कांही काळ राहिले होते.

येणे प्रमाणे श्री. दत्त महाराज हे वेदवेदान्ताचे न्यायकाव्यालंकाराचे, धर्मशास्त्र, धर्मग्रंथ यांचे पंडित असून फार मोठे संत पुरुष आहेत. एवढे प्रकांड पंडित असून ते अत्यंत विनयशील, साधे व प्रसिद्धी पराङ्गमुख आहेत. प. पू. श्री. टेंबे स्वामी यांनी त्यांच्या बालपणी त्यांना 'श्री. वक्रतुंड शास्त्र्यांचा अवतार' म्हणून प्रशंसोद्गार काढले ते अक्षरशः सत्य ठरलेले आहेत !

श्री धुंडिराज महाराजांनी सर्वांना ज्ञान, उपदेश, मार्गदर्शन व संकट निवारण करून अनेक प्रकारे उपकृत केले आहे. पण श्री. दत्त महाराज ही श्री धुंडिराज महाराजांची जगाला सर्वात मोठी व अमूल्य देणगी आहे !

Scanned with AnyScanner

श्री धुंडिराज महाराजांनी आपल्या सुदीर्घ जीवनात अनेक भक्तांना व व साहाय्यासाठी आलेल्या लोकांना दैवी उपाय योजून व अनुष्ठाने वगैरे सांगून त्यांचे अरिष्ट दूर केले आहे. त्यांचे भक्त या दैवी शक्तीला चमत्कार समजतात. असे कांही निवडक चमत्कार पुढे दिले आहेत.

■ ■ ■

। श्री ।

# 'चमत्कार'

श्री धुंडिराज महाराज यांना मंत्र–तंत्र, शास्त्र उत्तम अवगत असल्याने दैवी संकटावर ते अचूक उपाय योजू शकतात. त्यांच्या घरचाच एक प्रसंग आहे. त्यांची कन्या पद्मावती हिच्यासाठी स्थळे पहात असतांना एक ठिकाण निश्चित झाले. पण दुर्दैवाने नियोजित नवरदेव थोड्याच दिवसात मरण पावला ! नाइलाजाने पुन्हा वर संशोधन करून दुसऱ्या एका मुलाशी लग्न ठरविले. पण दैव दुर्विलास असा की तोही मुलगा लवकरच निधन पावला ! मग मात्र श्री धुंडिराज महाराजांनी मंत्र-तंत्र, शास्त्राचा आश्रय घेतला. एका कुंभात श्रीमहाविष्णुची मूर्ती स्थापन करून श्रीविष्णूशी आपल्या मुलीचा शास्त्रोक्त विवाह लावला. तो विधी पूर्ण झाल्यावर श्री धुंडिराज महाराज कांही वेळ त्या ठिकाणी स्तब्ध बसून राहिले. तोच नाद होऊन कुंभ आपोआप भंग पावला ! त्याबरोबर श्रीमहाविष्णूला नमन करुन व टाळी वाजवून श्री धुंडिराज महाराज आनंदाने उद्गारले "बस्स ! काम झाले ! विघ्न दूर झाले ! बाळ ! आता तुझा विवाह निर्विघ्नपणे खास पार पडेल !" त्याप्रमाणे पुढे लग्नाची खटपट केल्यावर लवकरच लग्न जमले व विवाह निर्विघ्नपणे व थाटात पार पडला ! ती सुकन्या आपल्या सासरी आनंदाने नांदू लागली !

श्री धुंडिराज महाराजांच्या ईश शक्तीचे व दैवी सामर्थ्याचे अनेक भक्तांना प्रत्यन्तर आलेले आहे.

एका भक्ताचा मुलगा तीन चार वर्षांचा झाला तरी त्याला चालता येईना व तो आधाराशिवाय बसूही शकत नसे. महाराजांना मुद्दाम घरी आणून व पाद्य पूजा करून मुलाला त्यांच्या पायावर घातले. महाराजांनी प्रेमळ दृष्टीने मुलाकडे पाहून त्याला गोंजारले ; व त्याच्या अंगावरुन व पायावरून हात फिरवला. थोड्याच दिवसात मुलगा वागडू लागला.

एका भक्ताला दोन मुलीच झाल्या व त्याही लहानपणीच वारल्या. म्हणून ते कुटुंब अतिशय कष्टी होते. श्री धुंडिराज महाराजांच्या चरणी ही मनोव्यथा निवेदन केल्यावर त्यांनी कांही अनुष्ठान व जप सांगितला. त्यांचे त्वरीत प्रत्यंतर येऊन त्या भक्ताला मुलगा झाला ! मुलाचे बारसेही न करता त्या चिमुकल्या बालकाला घेऊन मंडळीसह तो भक्त आनंदित व कृतज्ञ अंतःकरणाने देऊळगांव राजा येथे श्री महाराजांच्या दर्शनास गेला. त्याने मुलाला एका तबकात ठेवून ते तबकच महाराजांच्या चरणी अर्पण केले ! मुलाच्या पायात संरक्षणार्थ बेडी घालण्यास सांगून व मुलाला गोंजारुन व त्याच्या हाती दोन रुपये देऊन महाराजांनी त्या बालकाला आशीर्वाद दिला. ते कुटुंब आता सुखी समाधानी आहे.

श्री धुंडिराज महाराजांचे असंख्य शिष्य असल्याने संकट निवारणार्थ दैवी उपाय विचारण्यासाठी मंडळींची त्यांच्याकडे नेहमीच गर्दी असते पण उतार-वयातही कधीही चिडचीड न करता अगर त्रास न मानता मोठ्या आपलेपणाने व उत्साहाने ते सर्वांना साहाय्य करीत असतात.

देऊळगांव राजा येथील श्री. जगन्नाथ शेट धन्नावत यांना पुष्कळ वर्षे संतती नव्हती. त्यांचे वडील श्री. नारायण शेठजी यांनी श्री महाराजांना कृपा-प्रसाद मागितल्यावर श्री विनायक शांती, श्रीमद्भागवत सप्ताह, श्रीहरिवंश पारायण इत्यादि अनुष्ठाने श्री धुंडिराज महाराज यांनी सांगितली, इतकेच नव्हे तर करवून घेतली. त्यामुळे गृहबाधा जाऊन श्री जगन्नाथ शेठजींना दोन वर्षातच पुत्ररत्न झाले. देऊळगांव राजा येथील श्री. पुरणशेठ यांचीही कांही अरिष्टे श्री महाराजांनी सांगितलेल्या अनुष्ठानाने नष्ट झाली आहेत. जालना येथील श्री. भाऊसाहेब हिसवनकर यांच्या घराण्यावर श्री धुंडिराज महाराजांची विशेष कृपा आहे. श्री. हिसवनकर यांच्या घरात अनेक वर्षे असलेली भूतबाधा

Scanned with AnyScanner

श्री. महाराजांच्या कृपेने नाहीशी झाली. श्री. हिसवनकरांकडून देऊळगांव राजा येथे त्याप्रित्यर्थ श्री महाराजांनी तुलसीलक्षप्रदान व अन्न संतर्पण करवून घेतले.

चैत्री महोत्सवात एक भक्त त्यांना वाडीला भेटण्यास गेला असतांना गांवी फिरत निघतांना भक्ताच्या लहान मुलाला विंचू डसला व तो विव्हळू लागला ! महाराजांना कळताच ते घाईने तेथे आले व मुलाला जवळ घेऊन त्यांनी दंश झालेल्या भागावर हात फिरवला. थोडयाच वेळात विंचू उतरून गेला. विंचवाचीच गोष्ट निघाली म्हणून दुसरा एक आठवलेला गंमतीचा प्रसंग सांगतो. एक वैदिक ज्योतिषी महाराजांना मानणारे पण थोडे शिष्ठ होते. एकदा ते दारावरुन चाललेले पाहून महाराजांनी त्यांना आंत बोलावण्यास सांगितले. त्यांना 'महाराज बोलावताहेत' हा निरोप सांगितल्यावर चटकन येण्याचे सोडून ते गृहस्थ म्हणाले जरा महत्वाचे काम आहे. ते करून मग येतो म्हणून सांग' ते गृहस्थ घरी जाऊन कपडे काढतात न काढतात तोच त्यांना विंचवाने डंख मारला ! त्यांचे कसले महत्त्वाचे काम होते कोणास ठाऊक ! पण ते बाजूलाच राहून त्यांना पुष्कळ वेळ तडफडावे लागले !

त्यांच्या एका भक्तांचे आजोबा महाराजांचे अनुग्रहीत होते. ते भिक्षुक व सामान्य परिस्थितीतील होते. पण महाराजांच्या मार्गदर्शनानें व कृपाप्रसादाने त्यांची धार्मिक प्रवृत्ती वाढून त्यांनी गुरु चरित्राची पारायणे, विष्णुयाग, तीर्थ यात्रा वगैरे धर्मकृत्ये पुष्कळ करून गुरुंची एकनिष्ठपणे सेवा केली. त्यांच्या घराण्याची भरभराट होऊन या पिढीत तेलाची गिरणी त्यांच्या मालकीची आहे. या गिरणीची जागा घेईल त्याला आर्थिक तडाखा बसत असे तसा यांनाही बसला. पण महाराजांच्या मार्गदर्शनाप्रमाणे त्यांनी शतचंडी याग केला तेव्हां नुकसान भरून आले व पुन्हा त्रास झाला नाही. तसेच या घराण्यात जुनाट बलिष्ठ भूतबाधा होती. महाराजांनी स्वतः पुढाकार घेऊन ती नष्ट केली.

कोणाच्या संकटावर काय उपाय करावा हे तंत्र शास्त्र श्री धुंडिराज महाराज उत्तमोत्तम जाणतात. प्रत्येक सांसारिक रोगावर त्यांच्याजवळ रामबाण औषध आहे. त्यांचे वडील श्री वक्रतुंड महाराज यांनी त्यांना हा प्रसाद दिला आहे. एका भक्ताच्या खालावलेल्या सांपत्तिक स्थितीवर त्याला महाराजांनी भार्गवप्रोक्त सात आठ श्लोकांच्या श्री लक्ष्मीस्तोत्राचे पारायण करण्यास सांगितले व त्याला चांगले दिवस आले.

श्री धुंडिराज महाराजांच्या सहस्त्रचंद्रदर्शनाची देऊळगांव राजा येथे गडबड चालली असतांना एका भक्ताच्या लहान भावाच्या पत्नीला मॅनिनजायटीस झाला. म्हणून तिला जालन्याच्या मिशन हॉस्पिटलमध्ये नेले. पण तेथे बारा तेरा दिवस ती बेशुद्धच होती. विशेष आशा दिसेना म्हणून डॉक्टरांच्या सल्ल्यावरुन तिला औरंगाबादच्या मोठया हॉस्पिटलमध्ये हलविले. पण तेथेही 'हिला लवकर घरी घेऊन जा' असे सांगितले. पण श्री धुंडिराज महाराजांच्या आदेशाप्रमाणे तिला तेथेच ठेवले. त्यांनी धीर देऊन निश्चित सांगितले की यज्ञाच्या दिवशी नक्की फरक पडेल !' तिच्यासाठी महाराजांचा ध्यानधारणाजप त्या धामधुमीतही चालू होता. रोज तिची अनेकदा चौकशी करीत. आश्चर्याची गोष्ट अशी की यज्ञाच्या दिवशी औरंगाबादहून फोन आला की प्रकृती सुधारत आहे ! महाराज प्रसन्न होऊन म्हणाले 'डोळे उघडले ना ? मी शंभर टक्के खात्री देतो की ती वाचणारच !' त्याप्रमाणे फरक पडून ती स्त्री खणखणीत बरी झाली ! श्री धुंडिराज महाराजांच्या मारवाडी भक्तांना धंद्यात नुकसान येऊ लागले किंवा धान्याच्या बाबतीत आळ येऊन खटले झाले तर त्यांना धीर देऊन, त्यांच्यासाठी श्री गुरु चरित्राची पारायणे करवून घेऊन महाराजांनी त्यांना संकटातून सोडविले आहे.

देऊळगांव राजा येथील एका शेठजी भक्ताच्या पत्नीची हकीगत तर विलक्षण आहे. श्री बालाजीच्या आरतीच्या वेळी माध्यान्ही बासुंदीचा प्रसाद देवळात नेण्याचा त्यांचा नियम होता. देवळाच्या मार्गावरच एका घरात एक ब्राम्हण पिशाश्च होऊन राहिला होता. त्या भूताने या बाईंना पछाडले. कांही शारीरिक विकार असेल या कल्पनेने जालन्याला दवाखान्यात ठेवून व अनेक इन्जेक्शने देऊन व उपचार करून पाहिले. पण गुण येईना. पुष्कळ दैवीही

व मांत्रिक उपाय करून पाहिले. त्यासाठी जालन्याच्या महानुभाव मंदिरात व औरंगाबाद वगैरे ठिकाणीही जाऊन पाच सहा महिने मुक्काम केला. पण कांही उपयोग झाला नाही. शेवटी श्री धुंडिराज महाराज यांच्या पत्नी श्री. सौ आईसाहेब यांच्या दर्शनाला जाऊन त्या दुर्दैवी स्त्रीनें आपली कहाणी सांगितली व कृपा याचना केली. त्यांनी धीर देऊन घरी पाठविले. त्याच दिवशी सायंकाळी **श्री** धुंडिराज महाराज आपणहून शेठजीच्या घरी आले. त्यांनी श्री दत्ताच्या एकवीस माळा स्वतः अगर ब्राम्हणाकरवी रोज ओढण्यास सांगितले व कांही दिवसांनी स्वप्न पडेल. सर्व ठीक होईल' असा आशीर्वाद दिला. त्याप्रमाणे पौर्णिमेपूर्वी दोनच दिवस त्यांना स्वप्नात काळे कपडे व लुंगी घातलेला महानुभाव दिसला. त्याने एक थैली ठेवली व आशीर्वाद दिला. त्याचे काळे कपडे भगवे झाले ! जप दीड लाख झाल्यावर त्या बाईंची पिशाश्च बाधा जाऊन त्या पूर्ण बऱ्या झाल्या. 'मी बिमार होते काहो ? असे इतरांना विचारु लागल्या. त्यांनी खरोखरच पुष्कळ वर्षे हाल-अपेष्टा सहन केल्या. पिशाश्च बाधेने त्यांची अगदी केविलवाणी स्थिती झाली होती रात्री अपरात्री त्या ओरडत म्हणून लहान मुलांना त्यांच्याजवळ निजवण्याची सोय नव्हती. पण आशा विकोपाला गेलेली भूतबाधाही श्री धुंडिराज महाराज यांच्या कृपेने पूर्ण नाहिशी झाली.

राजूरजवळ तपोवन म्हणून गांव आहे. तेथे एकदा रुद्र स्वाहाकार झाला. पुण्याहवाचनानंतर मातृपूजन झाल्यावर अग्निमंथनाला प्रारंभ झाला तोच जोराची वावटळ व वादळ सुरु झाले. यज्ञभूमी भोवती मोकळे मैदान असल्याने धूर होई, पण अग्नि नारायण प्रगट होईना. सगळे सचित झाले. श्री धुंडिराज महाराज प्रथम थोडे दूर बसले होते. त्यांनी अग्नि देवाची काय प्रार्थना व आवाहन केलें असेल त्यांनाच माहीत. पण थोड्याच वेळात ते जवळ येऊन टाळी वाजवीत म्हणाले, 'आले ! अग्निनारायण आले ! पहा ! पहा !' तोच सर्वांना श्री अग्निनारायणाचे सधूप दर्शन झाले व जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला !

एक भक्ताचा मुलगा जालन्याला नोकरीस असतांना सायकलीवरुन पडून त्याच्या मांडीचे हाड निखळले. जालन्याच्या मिशनरी दवाखान्यात त्याला उपचार सुरु झाले. **श्री** धुंडिराज महाराज त्यावेळी सुदैवाने जालन्यालाच होते. अपघाताचे वृत्त कळताच ते व श्री. सौ. आईसाहेब भेटायला आल्या व धीर देऊन महाराज म्हणाले 'घाबरु नका. सर्व ठीक होईल. मात्र त्याला औरंगाबादला नेऊन तेथे इलाज करा' पण जालनाच सोयीचे वाटल्याने मुलावर तीन महिने तेथेच इलाज केले. पण गुण काही येईना. शेवटी महाराजांनी निक्षून सांगितले 'औरंगाबादला जा ! येथे रहायचे नाही' तेव्हा हा भक्त मुलाला औरंगाबादला दवाखान्यात घेऊन गेला. तेथे योग्य ते ऑपरेशन होऊन मुलगा बरा झाला. परत आल्यावर श्री धुंडिराज महाराजांच्या दर्शनास गेल्यावर त्यांनी आशीर्वाद दिला 'तुला चांगले चालता येईल. कांही राहणार नाही. त्याप्रमाणे कांही महिन्यातच मुलगा छान मांडी घालून बसू लागला व डबलसीट घेऊन सायकल चालवू लागला !

याच भक्ताचा भाचा नाशिक येथे पाठशाळेत शिकत असता कशावरून तरी गुरुजी त्याला एके दिवशी 'तू अगदी मठ्ठ दिसतोस !' असे म्हणाले. हे शब्द ऐकताच डोक्यात शिणक येऊन मुलगा कोणालाही न कळवता नाशिकहून गाणगापूरला निघून गेला. व तेथे अनुष्ठान करु लागला लांब परगांवी असलेल्या आई वडिलांना व वऱ्हाडातल्या या भक्त मामाला ही वार्ता कळताच ते फार काळजीत पडले. मुलाचा पुष्कळ शोध केला. पण पत्ता लागेना शेवटी या भक्ताने श्री धुंडिराज महाराजांना पत्र लिहून आपली व्यथा कळविली. त्यांचे लगेच उत्तर आले 'काळजी करु नये. मुलगा परत येईल !' भाऊबीजेला महाराज गाणगापूरला गेले तेव्हां त्यांना या मुलाचा शोध लागला. जड बुद्धीचे वैषम्य त्याच्या मनात असल्याने महाराजांनी त्याला सरस्वतीचा मंत्र दिला. व श्री दत्ताचा जपही चालू ठेवण्यास सांगितले आणि 'तुला दर्शन घडेल त्या दिवशी सरळ वऱ्हाडात मामाकडे जा ! असा आदेश दिला. इकडे या भक्ताला श्री महाराजांनी कळवून टाकले, तुमचा भाचा चंपाषष्ठीला परत येईल त्याप्रमाणे खरोखरच त्याच शुभमुहूर्तावर भाचा मामाकडे आपणहून आला !

एका भक्ताच्या बहिणीचे डोके फिरुन विहिरीत उडचा मारण्यापर्यंत तिची मजल गेली होती. महाराजांनी [illegible] देऊन पूर्ण बरी केली. त्या

Scanned with AnyScanner

व मांत्रिक उपाय करून पाहिलें. त्यासाठी जालन्याच्या महानुभाव मंदिरात व औरंगाबाद वगैरे ठिकाणीही जाऊन पाच सहा महिने मुक्काम केला. पण कांही उपयोग झाला नाही. शेवटी श्री धुंडिराज महाराज यांच्या पत्नी श्री. सौ आईसाहेब यांच्या दर्शनाला जाऊन त्या दुर्दैवी स्त्रीनें आपली कहाणी सांगितली व कृपा याचना केली. त्यांनी धीर देऊन घरी पाठविले. त्याच दिवशी सायंकाळी श्री धुंडिराज महाराज आपणहून शेठजीच्या घरी आले. त्यांनी श्री दत्ताच्या एकवीस माळा स्वत: अगर ब्राम्हणाकरवी रोज ओढण्यास सांगितले व कांही दिवसांनी स्वप्न पडेल. सर्व ठीक होईल' असा आशीर्वाद दिला. त्याप्रमाणे पौर्णिमेपूर्वी दोनच दिवस त्यांना स्वप्नात काळे कपडे व लुंगी घातलेला महानुभाव दिसला. त्याने एक थैली ठेवली व आशीर्वाद दिला. त्याचे काळे कपडे भगवे झाले ! जप दीड लाख झाल्यावर त्या बाईंची पिशाश्च बाधा जाऊन त्या पूर्ण बऱ्या झाल्या. 'मी बिमार होते काहो ? असे इतरांना विचारु लागल्या. त्यांनी खरोखरच पुष्कळ वर्षे हाल-अपेष्टा सहन केल्या. पिशाश्च बाधेने त्यांची अगदी केविलवाणी स्थिती झाली होती रात्री अपरात्री त्या ओरडत म्हणून लहान मुलांना त्यांच्याजवळ निजवण्याची सोय नव्हती. पण आशा विकोपाला गेलेली भूतबाधाही श्री धुंडिराज महाराज यांच्या कृपेनें पूर्ण नाहिशी झाली.

राजूरजवळ तपोवन म्हणून गांव आहे. तेथे एकदा रुद्र स्वाहाकार झाला. पुण्याहवाचनानंतर मातृपूजन झाल्यावर अग्निमंथनाला प्रारंभ झाला तोच जोराची वावटळ व वादळ सुरु झाले. यज्ञभूमी भोवती मोकळे मैदान असल्याने धूर होई, पण अग्नि नारायण प्रगट होईना. सगळे सचिंत झाले. श्री धुंडिराज महाराज प्रथम थोडे दूर बसले होते. त्यांनी अग्नि देवाची काय प्रार्थना व आवाहन केलें असेल त्यांनाच माहीत. पण थोड्याच वेळात ते जवळ येऊन टाळी वाजवीत म्हणाले, 'आले ! अग्निनारायण आले ! पहा ! पहा !' तोच सर्वांना श्री अग्निनारायणाचे सधूप दर्शन झाले व जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला !

एक भक्ताचा मुलगा जालन्याला नोकरीस असतांना सायकलीवरुन पडून त्याच्या मांडीचे हाड निखळले. जालन्याच्या मिशनरी दवाखान्यात त्याला उपचार सुरु झाले. श्री धुंडिराज महाराज त्यावेळी सुदैवाने जालन्यालाच होते. अपधाताचे वृत्त कळताच ते व श्री. सौ. आईसाहेब भेटायला आल्या व धीर देऊन महाराज म्हणाले 'घाबरु नका. सर्व ठीक होईल. मात्र त्याला औरंगाबादला नेऊन तेथे इलाज करा' पण जालनाच सोयीचे वाटल्याने मुलावर तीन महिने तेथेच इलाज केले. पण गुण काही येईना. शेवटी महाराजांनी निक्षून सांगितले 'औरंगाबादला जा ! येथे रहायचे नाही' तेव्हा हा भक्त मुलाला औरंगाबादला दवाखान्यात घेऊन गेला. तेथे योग्य ते ऑपरेशन होऊन मुलगा बरा झाला. परत आल्यावर श्री धुंडिराज महाराजांच्या दर्शनास गेल्यावर त्यांनी आशीर्वाद दिला 'तुला चांगले चालता येईल. कांही राहणार नाही. त्याप्रमाणे कांही महिन्यातच मुलगा छान मांडी घालून बसू लागला व डबलसीट घेऊन सायकल चालवू लागला !

याच भक्ताचा भाचा नाशिक येथे पाठशाळेत शिकत असता कशावरून तरी गुरुजी त्याला एके दिवशी 'तू अगदी मठ्ठ दिसतोस !' असे म्हणाले. हे शब्द ऐकताच डोक्यात शिणक येऊन मुलगा कोणालाही न कळवता नाशिकहून गाणगापूरला निघून गेला. व तेथे अनुष्ठान करु लागला लांब परगांवी असलेल्या आई वडिलांना व वऱ्हाडातल्या या भक्त मामाला ही वार्ता कळताच ते फार काळजीत पडले. मुलाचा पुष्कळ शोध केला. पण पत्ता लागेना शेवटी या भक्ताने श्री धुंडिराज महाराजांना पत्र लिहून आपली व्यथा कळविली. त्यांचे लगेच उत्तर आले 'काळजी करु नये. मुलगा परत येईल !' भाऊबीजेला महाराज गाणगापूरला गेले तेव्हां त्यांना या मुलाचा शोध लागला. जड बुद्धीचे वैषम्य त्याच्या मनात असल्याने महाराजांनी त्याला सरस्वतीचा मंत्र दिला. व श्री दत्ताचा जपही चालू ठेवण्यास सांगितले आणि 'तुला दर्शन घडेल त्या दिवशी सरळ वऱ्हाडात मामाकडे जा ! असा आदेश दिला. इकडे या भक्ताला श्री महाराजांनी कळवून टाकले, तुमचा भाचा चंपाषष्ठीला परत येईल त्याप्रमाणे खरोखरच त्याच शुभमुहूर्तावर भाचा मामाकडे आपणहून आला !

एका भक्ताच्या बहिणीचे डोके फिरुन विहिरीत उडया मारण्यापर्यंत तिची मजल गेली होती. महाराजांनी तिला दत्त मंत्र देऊन पूर्ण बरी केली. त्या

Scanned with AnyScanner

भक्ताच्या कुटुंबाच्या घरात पिशाच्च बाधा होती व त्यांना संतती नव्हती. श्री धुंडिराज महाराज स्वतः त्या घरी एकदा आसर असलेल्या खोलीत एकटे झोपले. बाजूला निजलेल्या मंडळींना त्या रात्री कंडाक्याचा वाद व झटापट ऐकू आली महाराज धीटपणे म्हणत होते 'मी जाणार नाही ! तूच येथून काळे कर. कसा जात नाहीस मी पाहतोच ! दुसऱ्या दिवशी सकाळी महाराजांना विचरल्यावर ते हंसून म्हणाले 'मला नाही बुवा कांही माहीत ! मी तर गाढ झोपलो होतो ! कदाचित झोपेत बडबडलो असेन !' पण हा विनोद सोडला तरी ही गोष्ट खरी की त्या दिवसापासून ते घर पिशाच्चाच्या त्रासापासून मुक्त होऊन त्या गृहस्थांना पुढे मुले बाळे होऊन घरी गोकुळ नांदले !

श्री धुंडिराज महाराज यांना मंत्र-तंत्र शास्त्र उत्तम अवगत आहे. एकाच्या अंगावर लाल चट्टे उमटले असतांना त्याला गार पाण्याचे स्नान व सांब मृत्यंजय जप त्यांनी सांगितला.

श्री धुंडिराज महाराज यांना वाचा सिद्धी आहे यात संशय नाही. अकोल्याला श्री डोंगरे महाराज यांच्या स्थानी भागवत संहिता अनेक दिवस वाचण्यात येते. ती वाचणारे लायक पुराणिक निवडण्यासाठी अर्ज बोलावण्यात आले. श्री धुंडिराज महाराजांचे देऊळगांव राजा येथील एका पुराणिक शिष्यांनी अर्ज पाठविला होता. पण गांवोगांवच्या विद्वान पुराणिकांनी अर्ज केले असतील तेथे आपला काय पाड लागणार ? अशी त्यांना साहजिकच शंका वाटत होती.

परीक्षेस जाण्याच्या दिवशी ते धुंडिराज महाराजांचा आशीर्वाद मागण्यासाठी त्यांच्या दर्शनास गेले. महाराजांनी आशीर्वाद देऊन हसत उद्गार काढले 'तुम्ही कसली परीक्षा देणार ? तुम्हीच उलटी परीक्षा घ्याल !' त्या शिष्यांना कांही अर्थबोध झाला नाही. पण दत्त जयन्तीच्या दिवशी अकोल्याला परीक्षा स्थानावर गेल्यानंतर तेथे त्यांना चार पाचशे विद्वान आलेले दिसले. परीक्षा सुरु करण्यापूर्वी मुख्य व्यवस्थापक यांनी सर्व विभागातून आलेल्या विद्वानातून प्रथम परीक्षक निवडले त्यांची नांवे जाहीर केली. त्यात या भक्ताचे नांव होते ! 'वाचमर्थोऽनुधावति' अशी श्री महाराजांची दिव्य शक्ती त्यांना त्यावेळी कळली व महाराजांनी देऊळगांव राजा येथे काढलेल्या सहजोद्गारांचा अर्थ उत्तमोत्तम पटला !

मराठवाड्यात श्री. मल्हारराव देशपांडे नांवाचे त्यांचे शिष्य नायब तहसीलदार होते. नबाबाच्या इतराजीमुळे त्यांच्यावर नोकरी जाण्याचा दुर्धट प्रसंग आला. श्री महाराजाकडे साहाय्यार्थ आल्यावर त्यांनी धीर दिला व भक्ताकडून देऊळगांव राजा येथेच आवश्यक ते अनुष्ठान करवून घेतले. आश्चर्याची गोष्ट अशी की या भक्ताच्या गैरहजरीतच त्याच्या विरुद्ध होणारी कारवाई रद्द होऊन त्यांची नोकरी तर गेली नाहीच पण त्याला बढती मिळून तहशीलदाराची जागा मिळाली ! त्यांनी महाराजांना गांवी नेऊन त्यांची हत्तीवरून मिरवणूक काढून यथायोग्य सत्कार केला !

असे श्री धुंडिराज महाराजांचे चमत्कार अनंत आहेत. नमुन्यादाखल कांही थोडे वर दिले आहेत. पण चमत्कार हे कांही त्यांचे वैशिष्ट्य नव्हे. सांसारिक आपत्तीवर त्यांना मंत्र-तंत्र शास्त्रातील अचूक व बिनतोड उपाय अवगत आहेत हे खरे. पण ते त्याचा दरबार कधीच करीत नाहीत. उलट 'मला काय येते ? देव त्याला योग्य वाटेल तर सर्व करतो. भक्तांचा तोच खरा कैवारी आहे" असेच ते भक्तांना सांगतात. भक्तांचा अपरंपार व्हावा म्हणून व भक्तांची देवावर दृढश्रद्धा बसून तो परमार्थ मार्गाकडे कायमचा वळावा हेच त्यांचे या बाबतीत सूक्ष्म धोरण असते. त्यांच्या मंत्र-तंत्र शास्त्रातील प्रभुत्वाचा ईश्वराच्या दरबारी किती मान आहे, त्यांना कशी अलौकिक वाक्सिद्धी आहे हे दिग्दर्शित करण्यासाठीच वरील चमत्कार वर्णन केले आहेत.

• • •

# स्वभाव विशेष

श्री धुंडिराज महाराज हे एवढे आत्मज्ञानी व साक्षात्कारी पुरुषोत्तम व पंडित असूनही त्यांचा स्वभाव व वागणें अतिशय साधें व प्रेमळ आहे. भक्ता-साठी इतके कष्ट करीत असतांना व त्यांना मुक्त हस्तानें कृपादान देत असतांना त्यांच्या वागण्यात कधी त्रागा किंवा चिडचीड दिसत नाही. तसेच इतके ज्ञानी असतांना गर्व किंवा ताठा आढळत नाही. आद्य श्रीशंकराचार्यांनी एका श्लोकात म्हटले आहे 'दानं प्रियवाक्सहितं ज्ञानमगर्वम्...' म्हणजे दान हे प्रेमळ शद्बांनी द्यावे, ज्ञानाचा अहंकार नसावा. श्री धुंडिराज शास्त्र्यांना हे वर्णन तंतोतंत लागू पडते.

श्री धुंडिराज महाराज सूर्योदयापूर्वी उठतात. लगेच स्नान करून तास दीड तास आन्हिक करतात. ते त्रिकाळ संध्या करतात. पूजा अर्चेचा त्यांचा नियम फार कडक आहे. स्नान संध्या आन्हिक यांची चांगली सोय असेल तेथेंच ते उतरतात. अन्य ठिकाणी राहू शकत नाहीत. एकदा तपोवन येथें यज्ञासाठीं गेले असतांना सायंसंध्येच्या वेळीं त्यांना आढळले कीं दत्तू बाळाची मूर्ती नाही! ती प्रवासात त्यांच्या कमरेलाच खोचलेली असते. दत्तू बाळ गेला म्हणजे सर्वस्व गेले! त्यांनी फराळ केला नाही, त्यांना कांही सुचेना. रात्रीं झोप आली नाही. शेवटी दत्तू बाळ सापडल्यावरच त्यांचे कार्यक्रम सुरूं झाले!

श्री. धुंडिराज महाराज भोजन फक्त दिवसा एकवेळच सर्वांबरोबर घेतात. रात्रीं दशमी खातात. त्यांना वाचनाचा फार छंद आहे. उतारवयातही दृष्टी साफ असून चष्मा लागत नाही.

परावलंबित्व हे त्यांच्या स्वभावातच नाही. 'एकटे का रहाता? आमचेकडे चला आम्ही सर्व व्यवस्था करतो' असे त्यांचे चिरंजीव, जांवई



आग्रहाने पुष्कळदा म्हणतात. पण स्वतंत्र एकटे रहाणेंच श्री. धुंडिराज महाराजांना आवडते. स्वत:ची कामे स्वत:च करण्यावर त्यांचा फार कटाक्ष आहे. दुसऱ्याला आपली सेवा ते सहसा करू देत नाहीत. ते रात्रीं आपल्या-जवळ कुणाला 'हवं, नको' पाहण्यासाठी निजू देत नाहीत. 'मला कांही लागत नाही, सगळ ठीक आहे' असे सांगून एकटेच झोपतात. रात्रीं अपरात्रीं त्यांचे नामस्मरण, ध्यान चालूच असते.

दिलेला शद्ब, वेळ पाळण्याबद्दल ते अतिशय दक्ष असतात. कोणाला 'उद्या तुझ्याकडे येईन' म्हणून कबूल केलें असलें व दुसऱ्या दिवशीं थोडा ताप असला किंवा हातपाय दुखत असले तरी तस्से त्या भक्ताकडे गेल्याशिवाय ते कधीं रहाणार नाहीत. 'खरोखर जाऊ नका. तुम्हाला त्रास होईल. उद्या परवा जा, वाटल तर आम्ही निरोप सांगून येतो' असे कितीही निवारले तरी ते कोणाचेही ऐकत नाहीत. थोडचा भावनेनेच उद्गारतात. "नाही हो! बिचारा वाट पहात असेल. आपण कबूल केलें आहें ना? मग गेलेच पाहिजे."

आळस हा शद्बच त्यांना ठाऊक नाही. त्यांच्या निमंत्रणावरून श्री रंगनाथ महाराज देऊळगांवराजा जवळील त्यांच्या विश्रांतीमठात येणार होते. श्री धुंडिराज महाराज त्यांच्या स्वागतासाठीं मठात गेले. तेथे वेळ होऊन गेली तरी श्रीरंगनाथ महाराज आलेलें नव्हते. मठापासून दोन तीन फर्लांगावर वाराणशी नदी असून सुमारें दीड कोसावर बोरखेडी आहे. तेथून श्रीरंगनाथ महाराज येणार होते. श्री धुंडिराज महाराज सरळ जालना मार्गाने त्यांच्या शोधार्थ चालूं लागले. सुदैवाने नदीपाशीच श्रीरंगनाथ महाराजांच्या दमन्या दिसल्या! नाहीतर हे महाराज बोरखेडीपर्यंत खास चालत गेले असते!

भक्तांच्या बद्दल त्यांचा लळा व जिव्हाळा कांहीं विलक्षणच आहे. भारजच्या एका भक्ताचें कुटुंब वारले. तेव्हां खामगांवला असतांना हीं बातमी कळताच ते घाईनें लहान मुलांना पहाण्यासाठी भारजला आले. जालन्याचे डॉ. काळे श्री महाराजांचे परमभक्त होते. एकदा श्रीमहाराज विशेष आजारी झाले.

विषमज्वरात अर्धांगाची भीति वाटूं लागली. डॉ. काळे यांनी सर्व प्रकारची योग्य ती औषध योजना करून व अतिशय परिश्रम घेऊन त्यांना बरे केले. त्यानंतर 'फी काय द्यावयाची?' म्हणून डॉ. काळे यांना साहजिक प्रश्न केल्यावर डॉ. हसून म्हणाले 'सांगतों, सांगतों! माझी फी फार जबर असते!' लगेच डॉक्टरांनी रोगी बरा झाल्याच्या आनंदोत्सवाप्रीत्यर्थ रोग्याच्याच घरी बँड बोलावला व श्री. धुंडिराज महाराजांची पाद्यपूजा करून १०१ रु. दक्षिणा ठेवली ! डॉक्टरांनी प्रणाम केल्यावर श्री धुंडिराज महाराजांनी सद्‌गदित होऊन आशीर्वाद दिल्यावर डॉक्टर टाळी वाजवून म्हणाले "मंडळी! मिळाली ही मला फी!" पुढेंही श्री धुंडिराज महाराज आजारी पडल्यावर औषधोपचार तर करीतच. पण गुरूंना लवकर बरें वाटावे म्हणून स्वत: श्रीगुरुचरित्राची पारायणें व इतर अनुंष्ठाने करीत !

अशा एकनिष्ठ शिष्याबद्दल गुरुंनाही पराकाष्ठेची आत्मीयता होती. डॉ. काळे वारल्यानंतर त्यांच्या मुलाचें पुण्याला लग्न ठरले. त्यावेळी श्री. धुंडिराज महाराज जाफराबादला ब्लडप्रेशरनें आजारी असतानाही कुणाचेही न ऐकता तस्से पुण्याला लग्नाला आशीर्वाद देण्यास हजर राहिले. "जाऊ नका! प्रकृती जास्त बिघडेल. आपण शुभाशीर्वादपर तार करूं' असा सल्ला देणाऱ्यांना श्री धुंडिराज महाराज म्हणाले डॉ. काळे यांचें व माझे संबंध कांही विशेष होते. माझ्या भावना मलाच माहीत! मला गेलेच पाहिजे. प्रकृतीचे काय वाटेल ते होवो! महाराज होणें सोप काम नाही!"

इतके उतार वय झाले आहे तरी स्वतःला हवे ते आपणहून उठून घेतात. इतकेच नव्हे तर, चहा झाला की 'माझ्यासाठीं इकडे आणूं नका. मीच तिकडे येतो' असे म्हणत प्रयासानें हात टेकीत उठून चहाच्या बैठकीत येतात. फार काय सांगावे? माझ्या सारख्या पान तंबाखू खाणारा भेटीला गेला कीं स्वत: उठून पान, चक्की, तंबाखू, सुपारी हे साहित्य जेथें असेल तेथून स्वत: घेऊन येऊन पुढे ठेवतात. तेव्हां फार ओशाळल्यासारखे वाटतें. पण हा त्यांचा अभिजात स्वभाव आहे.



'अन्नं न निंद्यात्' हे त्यांचे व्रत आहे. एखाद्याच्या घरी भोजन करतांना कुठल्या पदार्थात चुकुन तिखट जास्त पडले असेल किंवा मीठ विसरले असले तरी काहीच न बोलता शेवटी म्हणतात 'वा! स्वयंपाक छान झाला होता बर!' दुसऱ्याचे मन न दुखविण्याची त्यांची ही वृत्ती मोठी विलोभनीय वाटते. कोठे जेवायला गेले कीं मोकळेपणानें दुसऱ्यांना आग्रह करून व स्वत: आग्रहाला मान देऊन यथास्थित भोजन करतात. भोजन संपल्यावर विनोदाने शेजाऱ्याला विचारतात 'आता उठायलाच पाहिजे का? मी येथेंच काही वेळ बसून राहिलो तर चालेल ना? मला खरोखर उठवत नाही!' यावर आणखी महाभारतातील एक चुटका सांगतात "पांडवाकडे वनवासात सत्य परीक्षा घेण्यासाठी दुर्वास ऋषी शंभर शिष्य घेऊन आले व 'ब्राम्हण भोजनास आले आहेत. नदीवरून स्नान करून येतो' असे सांगून नदीतटावर गेले. कसेतरी भोजन तयार केल्यावर नकूल सहदेव त्यांना भोजनाची तयारी आहे. चला' असे सारखे बोलवावयास जात. तरी ते मुद्दाम येईनात. शेवटी भीमाला गदा घेऊन जावे लागले तेव्हां कुठे सगळे पळतच भोजनस्थळी आले. तशी काही युक्ती करून मला उठवा बुवा!"

स्नानसंध्या व देवाचे आटोपल्यावर दर्शनास सारख्या येणाऱ्या लोकांना व भक्तांना भेटी देणें हाच त्यांचा मुख्य कार्यक्रम असतो. लोक त्यांना विश्रांतीसाठी उसंतच देत नाहीत पण श्री धुंडिराज महाराजही त्यांना पुरून उरतात थकवा, कंटाळा, त्रास, चिडचीड या गोष्टी त्यांच्या स्वभावातच नाहीत. लोकांचे मन दुखविणें त्यांच्या अगदी जिवावर येते. दर्शनाला येणाऱ्यांची फारच गर्दी होऊ लागली कीं जवळची मंडळी साहजिकच आपलेपणाने म्हणतात "महाराज! आता थोडी विश्रांती घ्या. लोक काय पुन्हा येतील. त्यांना आम्ही सांगतो." यावर नाखूष मुद्रा करून श्री धुंडिराज महाराज उत्तर देतात 'छे! छे! मला मुळीच थकवा आलेला नाही. अहो! एवढ्या प्रेमाने ब अडचणी सांगायला येतात. त्यांचा अनादर कसा करूं?

भक्तांच्याबद्दल खूप लळा असला तरी भक्तांनी आपले आन्हिक न चुकता



Scanned with AnyScanner

केले पाहिजे याबद्दलही ते जागरूक असतात. सहज विचारल्यासारखे करून, पण हटकून प्रश्न करतात "काय ? स्नानसंध्या झाली ना ? स्तोत्रें, जप आटोपला ना ?" त्याचप्रमाणें संस्कृत पाठ शुद्ध व बरोबरच म्हटला गेला पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष असतो चुका किंवा अशुद्ध उच्चार त्यांना मुळीच खपत नाहीत. या सेवा कार्यात ते निष्णात असल्यानें यज्ञ चालला असतांना बारिक लक्ष ठेऊन सर्व सशास्त्र होत आहे ना! कुठे चुक होत नाही ना, हे ते सतत पहात असतात.

श्री धुंडिराज महाराजांचा ठळक दिसणारा गुण म्हणजे त्यांचा साधेपणा. त्यांच्याकडे पाहिल्यावर किंवा कामापुरते बोलल्यावर ते सर्वसाधारण भिक्षुक वर्गापैकीच असतील असाच अपरिचित मनुष्याचा ग्रह होईल. पडदानशीन कुलस्त्री आपला मुखचंद्र सदैव अवगुंठितच ठेवते किंवा तिजोरीत अलोट संपत्ती झांकून ठेवणारा कृपण श्रीमंत फाटके धोतर नेसूनच बाहेर वावरतो, त्याप्रमाणें त्यांचा वेदवेदान्ताचा गाढव्यासंग व आध्यात्मिक श्रेष्ठता या साधेपणाने पूर्ण झाकलेली आहेत.

प्रवासात यामुळें कधी कधी गंमती होतात. मराठवाड्यातून जालन्याकडे येत असतांना बसमध्यें त्यांच्या शेजारी एक खेडूत बसला होता. पायात जोडाही नाही व अगदी साधा वेष त्यामुळें तो श्री धुंडिराज महाराजांना साधा भटजीच समजला. प्रथम त्यांने विचारले "बिडी पिता का ?" नाही म्हटल्यावर त्यांने पुन्हां विचारले 'तंबाखू तर चालेल ना?' तीही नको म्हटल्यावर त्याला आश्चर्यच वाटले ! जालन्याला दोघेही उतरले. श्री धुंडिराज महाराजांनी स्टँडवर आलेली भक्त मंडळी त्यांच्या पाया पडू लागली तेव्हा या शेतकऱ्याला उलगडा झाला ! तोंडात मारून घेऊन त्याने महाराजांचे पाय धरून क्षमा मागितली. पण महाराज हसून म्हणाले "अहो ! मी खराच साधा भटभिक्षुक आहे. तुमच काय चुकल ?"

श्री धुंडिराज महाराजांना लहान मुलांचा फार लळा आहे. लहान मुलांशी त्यांच्यासारखे बोलून ते त्यांना खेळवतात. "अरे ! तू बंड्या तर मीहि



धोंड्याच आहे ! आमच्या वडिलांची मुलें जगत नव्हती. मग मी धोंड्या झालो !" अशा गंमती करून ते मुलांना हसवितात मुलांशी ते नेहमी इतके समरस होतात म्हणूनच तेही बालस्वभावी झाले आहेत कीं काय कोण जाणे ! त्यांच्याकडे दर्शनास येणारे लोक इतका प्रसाद आणतात कीं त्यावर एखादे मेवामिठाईचे दुकान उत्तम चालेल ! हा सगळा प्रसाद ते लोकांना व विशेषतः मुलांना वाटून टाकतात. म्हणून लहान मुलेही मोठ्या माणसामारखी रोज न चुकता त्यांच्या म्हणजे प्रसादाच्या दर्शनासाठीं त्यांच्याकडे येत असतात. भेटीला आलेल्या भक्ताचें तोंड उष्टे झालेच पाहिजे असा श्री धुंडिराज महाराजांचा दंडक आहे

विनम्रपणा, लीनता हा त्यांचा सहजगुण आहे. त्यांच्या कृपा प्रसादानें इष्टसिद्धी झाल्यावर भक्त कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी येतात, त्यावेळी श्री महाराज मनापासून म्हणतात "अहो ! मी काय केलं? मी तुमच्यासारखाच आहे ! ही ईश्वराची कृपा समजा !" त्यांच्या विद्वत्तेबद्दल बैठकीत कोणी प्रशंसा करू लागले कीं श्री महाराज चटकन म्हणतात "अहो ! मला काय येतय? मी कोण ? दत्तू खरा पंडित !"

त्यांच्या या साध्या स्वभावामुळे त्यांच्याशी बोलतांना संकोच अगर 'हे कस विचारू? उत्तर देतील ना?' असे कधीच वाटत नाही. एकदा 'तुम्हाला जागृतावस्थेत देवाचें प्रत्यक्ष दर्शन झालेले आहे का?' असा मी त्यांना नम्रपणें पण सरळ प्रश्न केला. त्यांनीही मनमोकळेपणानें 'नाहीं' असे उत्तर दिले. पण पुढे ते म्हणालें "स्वप्नांत गुरुंचे मला पुष्कळदा दर्शन घडलेले आहे. माझे वडील व श्री वासुदेवानंद सरस्वती यांना मी देवच समजतो. त्या दृष्टीने मला एक प्रकारे देवाचेच दर्शन घडते पण परमेश्वर साधनेने माझ्या चित्ताला दृढ श्रद्धा शांती व परम समाधान लाभलेले आहे यांत काहीच शंका नाही !" त्यांच्या या आन्तरिक परम समाधानामुळें त्यांच्या वागण्यांत काही एक विलक्षण गोडवा, ऋजुता व शालीनता आलेली आहे !

श्री धुंडिराज महाराजांच्या अभिजात शालीनतेचा एक प्रसंग सांगण्यासारखा



Scanned with AnyScanner

आहे. ते बुलडाण्याला आल्यावर त्यांची ओळख होऊन त्यांची थोडी माहिती मला मिळाली. त्यांच्या वडिलांना स्वयंभू दत्तमूर्ती प्रसाद म्हणून मिळालेली असून श्री धुंडिराज महाराज कुठेही असले तरी प्रवासात सुद्धा ती मूर्ती त्यांच्या बरोबरच असते असे त्यांच्या एका भक्ताने मला सांगितले. त्यावरून साहजिकच तीं मूर्ती पहाण्याची मला इच्छा झाली. पण पूजेच्या सकाळच्या वेळी कोर्टाच्या कामामुळें मला त्यांच्याकडे जाणें सोईचे नव्हते. म्हणून लांबूनच का होईना, पण त्या मूर्तीचे दर्शन घ्यावे या उद्देशाने सायंकाळी मी त्यांच्या दर्शनास गेलो. मूर्ती पहाण्याची इच्छा दर्शवितांच 'वा! छान! दाखवतो ना!' असे म्हणून ते बैठकीतून आत गेले. कांही कामासाठी गेले असतील म्हणून मी बाहेर बैठकीत बसून राहिलो. काही वेळाने त्यांनी मला पलीकडच्या खोलीतूनच आत बोलावले. तेथें जाऊन पहातो तो श्री धुंडिराज महाराज सोवळे नेसून पाटावर बसले होते. त्यांनी ती दत्तमूर्ती मुद्दाम देव-धरातून काढून व फुले वगैरे काढून टाकून हातात धरली होती! अगदी जवळून त्या मूर्तीचे छान दर्शन झाल्याने मला फार आनंद वाटला! नंतर त्या मूर्तीला व त्यांना वन्दन करून मी थोडा ओशाळूनच म्हणालो "माझ्याकरिता तुम्हास उगाच सोवळे नेसण्याचा व पूजेतील मूर्ती बाहेर काढण्याचा त्रास पडला. लांबूनच देव्हाऱ्यातूनच मी ही मूर्ती पाहिली असती" यावर ते मना-पासून हसून म्हणाले 'छे! छे! यात कसला त्रास? अहो! सोवळे नेसणें हे पुण्यकर्म आहे! उलटे तुमच्यामुळे मला हे पुण्य घडले!" ■ ■

। श्री ।

# संतश्रेष्ठ श्री धुंडिराज महाराज

श्री धुंडिराज महाराज हे आधुनिक काळातील उच्च कोटीचे सन्त आहेत.

संत हे देहाविषयी पूर्ण उदासीन असतात. त्यांच्या मुखावर निश्चयाचें समाधान विलसत असते. ते गुह्यज्ञान प्रगट करणारे व अंतरीची सोय सांगणारे असतात. ते पुण्यशील, शुचिश्मन्त व अभ्यन्तरी निर्मळ असतात. पापी लोकांनी सतत स्नानें केल्याने आलेली आगांतुक अपवित्रता घालवुन पुन्हां निर्मळ होण्यासाठी तीर्थे ही संताच्या भेटीसाठी सदैव आतुर असतात असे म्हणतात. संताची माया आपल्यावर जडवून घेतली तर देव आपोआप भेटतो. संतसेवेइतके परमार्थ प्राप्तीचे दुसरे सोपे व गोमटे साधन सापडणें कठीण आहे. संताची कृपा ही दुपारच्या सावलीप्रमाणें आधी लहान व पुढे पुढे वाढत जाणारी असते. स्वतःच्या सुखासाठी जे जितके विरक्त व कठोर असतात तितकेच भक्तांच्या कल्याणासाठीं उत्सुक व तत्पर असतात. परोपकार हा त्यांचा स्वभावधर्म आहे. भवरोग वैद्य हाच त्यांचा व्यवसाय असतो. देव हेच त्यांचे भांडवल असून देवाच्या व्यापाराशिवाय इतर गोष्टींना त्यांना फुरसतच नसते. ते भूतदयार्णव असून भाविकांना सगुण भक्तीचा मार्ग दाखविण्याचा त्यांना छंदच असतो. त्यांचे सहज बोलणें हा हितोपदेशच असतो. त्यांचा स्वभाव शांत, भाविक व सात्विक असून सकल जनांशी त्यांचे वागणें लीन व आर्जवी असते. भक्तांच्या अन्तःकरणातील अहंकाराचे ठाणें उठवून जस जसा भाव तम तसा ते अनुभव देतात. त्यांचा सहवास हे आनंदाचे स्थल व संतो-षाचे मूळ आहे. त्यांची भेट झाली असता मनाला विश्रांती व तृप्ती मिळते. संत हे मुक्तीचे माहेरच आहेत. सुवासिनीला माहेरी आल्याव जसा मोकळे-पणा व आल्हाद वाटतो तशी प्रसन्नता संतसंगामुळे लाभते. माता आपल्या पोटातील गर्भाला पाहू शकत नसली तरी जिव्हाळ्याने त्याचा प्रतिपाळ करते.

Scanned with AnyScanner

त्याचप्रमाणें सांसारिक भक्त आध्यात्मिक बैठकीपासून कितीही दूर असले तरी संत त्यांना आत्मीयतेनें जवळ करतात.

वहात्या गंगेप्रमाणें संताचे मन निर्मळ असल्यानें भगवंत नेहमी त्यांच्या जवळच असतो. स्वानंदाच्या भाग्याचे त्यांना दर्शन घडलेले असते. मीठ एकदा पाण्यात पडले की पाण्याशी एकरूप होते, पुन्हां निराळे बाहेर काढता येत नाही, त्याप्रमाणें संताची चित्तवृत्ती ब्रम्हात समरस झाली असल्यानें पुन्हां मायाजालात येऊंच शकत नाही. सांसारिक इच्छांची व आकाक्षांची तृप्ती म्हणजे समाधान असा आपला ऐहिक अर्थ आहे. पण हे खरे शाश्वत समाधान नव्हे· 'समाधान' या शद्वातील 'धा' या धातूचा मूळ अर्थ 'स्थिर असणें' असा आहे. सम+आ+धा म्हणजे शुद्ध ब्रम्हात सदैव जे स्थिर असते तेच खरे समाधान ! प्रसन्नचेतस संताच्या निरागस मुखकमलावर या खऱ्या समाधानाचे रम्य स्वरूप पहावयास मिळते. ईश्वरी अनुग्रह, ईशसेवा, तप, आध्यात्मिक ज्ञान, ज्ञातेपणा न मिरवणारी लीनता, निरभिमान, निरपेक्षता, निर्लोभता, मौन, आर्जव, विनय, शुचिता, दया इत्यादि अनंत गुणरत्नांची संत हे खाणच आहेत. दासबोधातील सद्गुरुस्तवनात संताचा महिमा वर्णितांना सूर्य, सुवर्ण, गंगा, सागर, मेरू गगन इत्यादि अनेक उपमेये कमीच पडतात असें दाखवून शेवटी श्रीसमर्थ म्हणतात 'म्हणोनि सद्गुरु वर्णवेना । हेचि गे हेचि माझी वर्णना । अन्तः स्थितीचिया खुणा । अन्तर्निष्ठ जाणती ।।

श्री धुंडिराज महाराजांना संताचे वर वर्णिलेले गुण यथार्थतेनें लागू पडतात.

श्री धुंडिराज महाराज हे ज्ञानी भक्त आहेत 'कृपालुत्वादि' संताची अठ्ठावीस लक्षणें त्यांच्या अंगी पूर्ण मुरलेली आहेत. 'यस्मान्नोद्विजते लोको...' या गीतेच्या बाराव्या अध्यायात वर्णिलेले लक्षण त्यांच्या अंगी पदोपदी दिसून येते. लोक त्यांना कंटाळण्याचा प्रश्नच नाही. उलट ते मधमाशा मोहळाकडे त्याप्रमाणें त्यांच्याकडे धांव घेतात. पण इतके लोक सतत दर्शनास येत असतांना श्री धुंडिराज महाराजांच्या मुद्रेवर अढी, त्रास, कंटाळा कधीही दिसला नाही. 'वा ! आलात ! या ! छान !' असेच हसत मुखाने व आपुलकीने ते सर्वांचे स्वागत करतात. स्वतःला किंवा स्वतःचे कुळ उद्धरणें यात विशेष नवल नाही. आश्रयाला आलेल्या भक्तांची कुळे उद्धरणें यांत संताचे संतपण आहे. निर्याणाच्या अभंगात श्री तुकाराम महाराज म्हणतात 'आपण तरले नव्हे ते नवल। कुळें उद्धारील। सर्वांची तो।।' भागवतात 'साधवोन्यासिनः शांताः...' इत्यादि श्लोकात संताचे वर्णन आले आहे की 'ते शांत असून त्यांच्या संगतीनेच भगवद्भक्ती व ईशप्राप्ती निश्चित होते. संत हे दुःसंगाचा परिणाम दूर करणारे असतात. तीर्थ, योग यापेक्षांही सत्संग श्रेष्ठ आहे' हे सर्व वर्णन श्री धुंडिराज महाराजांचेच आहे. असे वाटते. श्री टेंब्ये स्वामी म्हणत असत "सदा संतापाशी जाऊन बसावे. त्यांनी उपदेश न केला तरी त्यांच्या गोष्टीच ऐकाव्या. त्या श्रवण भक्तीनेही परम कल्याण होईल !"

संताच्या दर्शनाने वासना थोडचातरी व हळूहळू कां होईना पण क्षीण होतात व मनाची तळमळ थांबून ते शांत होते. संसार न सुटता चित्तात श्रद्धा उत्पन्न होते. श्रद्धा म्हणजे भोळसटपणा व कशावरही अंध विश्वास ही समजूत बरोबर नाही. श्रद्धा ही पूर्व पुण्याईने संत सहवासाने मिळणारी फार मोठी मौलिक देणगी आहे. संत कृपेने श्रद्धेतूनच, पुढे ईश्वराकडे, मन वळून भगवंताच्या नामाचे प्रेम उत्पन्न होते; व तेच अनुसंधान टिकले म्हणजे संतप्रसादाने ईश्वरी कृपेचा अमोल लाभ पदरात पडतो. शेवटी मन पांगळून नामरूपातीताचें दर्शन घडते !

अशा श्री धुंडिराज महाराजांसारख्या संताची संगती शोधणें व त्यांची यथाशक्ती सेवा करणें हे परमार्थातले सर्वांत सोपे साधन आहे. त्यातून आपल्यासारख्या सांसारिकांना, संन्यासी, योगी संतापेक्षा, संसारी संत जास्त जवळचा वाटतो. आपल्या अडचणी व दुःखे त्याला थोडचा फार स्वानुभवाने माहीत असतात. नदीला ज्याप्रमाणें 'तुझ्याकडे पाणी प्यायला केव्हां येऊ?' असे विचारण्याची गरजच नसते त्याप्रमाणे श्री धुंडिराज महाराजांसारख्या संताकडे केव्हांही मनमोकळेपणाने दर्शनास जावे. पृथ्वीप्रमाणे हे संत क्षमारूप

Scanned with AnyScanner

असतात. जमिनीवर चेंडू मारला तर प्रतिक्रियेने तो उलट वर फेकला जातो त्याप्रमाणें जरूर तेथें संत प्रतिकारही अवश्य करतात. पण तो पृथ्वीप्रमाणें निर्वैर असतों किंबहुना संघर्ष होऊच न देणें हे संताचे धोरण असते. दोन भांडी एकमेकावर आदळली कीं ध्वनी उत्पन्न होतो पण आपण भाड्यांना नुसता हात लावला कीं तो शांत होतो, त्याप्रमाणें आपल्या अन्तःकरणातील द्वंदे व खळबळ संताच्या नुसत्या प्रेमळ स्पर्शाने शांत होते. आपण अत्तर लावलेले असले की जवळच्यांना जसा आपोआप सुगंध येत रहातो त्याप्रमाणें श्री धुंडिराज महाराजांसारख्या सताच्या नुसत्या दर्शनाने त्यांची प्रसन्नता समाधान व शांती आपल्यात प्रवेश करतात.

श्री धुंडिराज महाराजांसारख्या श्रेष्ठ संताचा आपल्याला लाभ झाला हे आपण आपले परमभाग्य व पूर्वजन्मीचे परम पुण्य समजलें पाहिजे. त्यांचा कृपाप्रसाद आपल्यावर व्हावा अशी खटपट केली पाहिजे. श्री धुंडिराज महाराजांबद्दलच मी म्हणत नाही. पण संत हे साधारणतः निरिच्छ व निष्कांचन असतात. त्यांच्या सहवासात मुद्दाम रहाण्याचा प्रयत्न केल्यास त्यांची सेवा व प्रसंग विशेषी त्यांना साहाय्य करण्याची संधी आपणास आपोआप मिळते. कोणी कांही मदत केली त्याचे उतराई होण्याचा प्रयत्न करणें हा मनुष्य स्वभावच आहे. संताजवळ व्यावहारिक दृष्टीने देण्यासारखे फारसे काही नसेलच. म्हणून मग ते अगदी मनापासून आपल्याला आशीर्वाद देऊन आपले अभीष्टचिंतन करतात. आणि त्यांना वाक्सिद्धी असल्याने व परमेश्वर त्यांचा ऋणी असल्याने त्यांचे शब्द खरेच ठरतात! या पेक्षा अलभ्य लाभ दुसरा कोणता सापडणार!

श्री धुंडिराज महाराज यांची उग्ररथ षष्ठ्यब्दिपूर्तीशांती महामहोपाध्याय श्री. श्रीधरशास्त्री वारे यांच्या शुभहस्ते नाशिक येथें साजरी झाली. १९५६ मध्यें भीमरथी सप्तद्बपूर्तीशांती व विष्णुयाग देऊळगांवराजा येथें श्रीव्यंकटेश चरणी संपन्न झाला. त्यावेळी श्री. शिरोळकर शंकराचार्य यांनी त्यांना 'भक्त-रत्न हो पदवी अर्पण केली. श्री धुंडिराज महाराज यांच्या सहस्त्रचंद्रदर्शन महोत्सवाचें वेळी श्रीगणेशयाग, शतचंडी, श्रीदत्तयाग, श्रीमद्भागवत स्वाहाकार व श्रीदिगंबर नामसप्ताह इत्यादि अनेक मोठमोठाले धार्मिक विधी झाले. त्याप्रसंगी श्री शृंगेरी पीठाचार्य, श्री. योगिराज गुळवणी महाराज, वाडीकर, श्री. जेरेशास्त्री इत्यादि नामांकित विद्वान व आध्यात्मिक संतश्रेष्ठ अभीष्टचिंतनास उपस्थित होते. त्यांची ८५ वी रौद्रशांती देऊळगावराजा येथें १९७१ सालीं मोठ्या थाटात भक्तमंडळींनी साजरी केली. परमेश्वर कृपेने व आपल्या सर्वांच्या पूर्वपुण्याईनें श्री धुंडिराज महाराज यांची ९० वी सौरीशांती त्यांचे भक्त, अभिमानी व धर्मपरायण सज्जन स्वयंस्फूर्तीनें मोठ्या थाटात व सशास्त्र श्रीक्षेत्र देऊळगांवराजा येथें साजरा करीत आहेत ही फार आल्हादाची व अभिमानाची गोष्ट आहे.

श्री धुंडिराज महाराजांसारख्या श्रेष्ठ संताना व हरीच्या दासांना आकल्प आयुष्य लाभो व त्यांच्या सहवासाने व कृपाप्रसादानें आपणा सर्वांच्या दुरिताचा समूळ नाश होऊन व आपल्याला परमार्थाची वाट सांपडून श्री धुंडिराज महाराजांचे सुदीर्घ जीवन कृतार्थ व परोपकारानें विभूषित होवो अशी त्या जगन्नियंत्याजवळ नम्र व कळकळीची प्रार्थना आहे!

॥ शुभं भवतु ॥

Scanned with AnyScanner